विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष तिसरे । अंक नववा । सप्टेंबर २०२४

















राज्यभरातून शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

## महा. अंनिसचे विविध उपक्रम

### वयात येताना (लैंगिकता प्रबोधन सप्ताह)



मार्गदर्शन करताना मुक्ता निशांत (करवीर)



मार्गदर्शन करताना डॉ. सविता शेटे (बीड)



मार्गदर्शन करताना डॉ. कविता मते (नागपूर)




मार्गदर्शन करताना दिलीप भारंबे आणि दिगंबर कट्यारे (जळगाव)



मार्गदर्शन करताना डॉ. अलकाताई कुलकर्णी (शहादा)



एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा (कोल्हापूर) आरती नाईक,
कृष्णात स्वाती, हर्षल जाधव व साथी



जिल्हा बैठक (नवी मुंबई) विजय परब, अशोक निकम,
पवन कोकाटे, राजेंद्र पंडित, महेंद्र राऊत, किरण वाळुंज व साथी



पोलीस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल, उदगीर (लातूर)
प्रा. बाबुराव माशाळकर, डॉ. बळीराम भुक्तरे व साथी

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
संपादक मंडळ
• संपादक
डॉ. नितीन शिंदे
• कार्यकारी संपादक
उत्तम जोगदंड
• सहसंपादक
डॉ. श्यामसुंदर मिरजकर
• व्यवस्थापकीय संपादक
अजय भालकर
• सदस्य
डॉ. मांतेश हिरेमठ
डॉ. बाळू दुगडूमवार
प्रल्हाद मिस्त्री
डॉ. सुशील मेश्राम
डॉ. अरुण शिंदे
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे
• सल्लागार मंडळ
किशोर बेडकिहाळ
डॉ. प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार
• प्रकाशक
संजय बनसोडे
• कार्यालयीन पत्ता
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
ता.वाळवा जि.सांगली ४१५४०९
मो. ९३५९०८०८२०
email : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in
• अंक वितरण
आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
• मुखपृष्ठ
सचिन भोसले/कोल्हापूर
• स्वागतमूल्य : ₹ २०/-
• पृष्ठ संख्या : ४०

**वार्षिक वर्गणी**
४०० रू. (व्यक्तीसाठी) ५०० रू. (संस्थेसाठी)
**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :**
**विवेक जागर संस्था**
ICICI **बँक, धुळे**
**खाते नंबर :**646301002757
IFSC Code : ICIC0006463
Scan & Pay

आम्ही वारस विवेकाचे

विज्ञान निर्भयता नीती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**R.N.I.No. MAHMAR/2022/83669**
**वर्ष तिसरे । अंक नववा । सप्टेंबर २०२४**

## अनुक्रमणिका

• **संपादकीय...** ४
• **प्रासंगिक**
सत्य-असत्याशी मन केले ग्वाही/जगदीश काबरे ५
परिवर्तनाचे वाटसरू : कृष्णाजी कर्काजी चौधरी/डॉ. गोविंद काळे ७
खरंच, नशीब असतं का?/जितेंद्र रायपुरे १०
लैंगिकता शिक्षणाचे टप्पे/सचिन थिटे ११
पर्यावरणीय समस्या : जबाबदार मानव की विज्ञान?/विनोद दळवी १३
• **बुवाबाजी**
विवेकी विरांचे बीज पेरावे तरी कसे?/चंद्रसेन टिळेकर १६
आधुनिक स्त्री आणि बुवाबाजी / अरुणा गोहणे १८
• **चिकित्सा**
आदिवासी विकासाबाबत उदासीनता/डॉ. दीपक मगरदे २०
भयाची गोष्ट/अनुज हुलके २२
• **कविता**
आता बोलायला शिक / उपेंद्र रोहनकर २४
तर, चालता हो इथून... / सुनिता तागवान २५
महिमा वृक्षांचा/साहेबराव गायकवाड २६
• **पुस्तक परीक्षण**
धर्मरेषा ओलांडून विवेकाकडे, मानवतेकडे... / राजेंद्र फेगडे २७
• **वृत्तांत**
लैंगिकतेचे पदर उलगडताना... / मयूर पटारे ३१
• **महा. अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३४

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

## ।। संपादकीय ।।

### बुद्धिप्रामाण्यवादाचा लखलखता तारा- डॉ. शंतनू अभ्यंकर

प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ, बुद्धिप्रामाण्यवादी, तर्कवादी विचारवंत, विज्ञानवादी कार्यकर्ते, वक्ते, नाटककार, लेखक डॉ. शंतनू अभ्यंकर यांचे दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी वयाच्या साठाव्या वर्षी कर्करोगाने निधन झाले. एक संवेदनशील माणूस, उत्तम संघटक, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा खंदा कार्यकर्ता, विज्ञानवादी आणि पुरोगामी विचारांचा, मानवतेचा पुरस्कर्ता आज विवेकवादी चळवळीने गमावलेला आहे.

पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमधून वैद्यकीय पदवी (एमबीबीएस) व स्त्रीआरोग्य आणि प्रसूतिशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी त्यांनी संपादित केली होती. वाईमध्ये 'मॉडर्न क्लिनिक'च्या माध्यमातून त्यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वैद्यकीय सुविधा सुरू केल्या होत्या. त्यामुळे वाई आणि परिसरातील लोकांसाठी डॉ. शंतनू 'संजीवनी' बनले होते. कमीत कमी सिझेरियन पद्धतीच्या प्रसूती करणारे डॉक्टर अशीही त्यांची परिसरात ख्याती होती.

डॉ. शंतनू अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते होते. आपल्या विविध भाषणांतून त्यांनी विज्ञानवादी भूमिका ठोसपणे मांडली. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यामध्ये 'शास्त्रज्ञ आजीच्या गोष्टी', 'आधुनिक वैद्यकीची शोधगाथा', 'फादर टेरेसा आणि इतर वल्ली', 'आरोग्यवती भव', 'संभोग का सुखाचा? 'बायकांत पुरुष लांबोडा', 'डॉ. क्युटरस' इत्यादी पुस्तकांचा समावेश होतो. रिचर्ड डॉकिन्स यांच्या The Magic of Reality या पुस्तकाचा त्यांनी 'जादूई वास्तव' या शीर्षकाने भावानुवाद केलेला आहे. स्त्रीच्या भावविश्वातील महत्त्वाचा विषय म्हणजे पाळी, जिच्यावर उघडपणे बोलायला स्त्रिया आजही संकोचतात. त्याविषयी 'पाळी मिळी गुपचिळी' हे त्यांनी लिहिलेले पुस्तक खूप गाजले. 'अर्थ स्त्री आरोग्याचा' हे स्त्रीआरोग्याशी निगडित वृत्तपत्रीय सदरही त्यांनी लिहिले होते. दोन वर्षांपूर्वी चौथ्या टप्प्यात असणाऱ्या कॅन्सरचे निदान झाल्यानंतर त्यांनी लिहिलेला 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' हा लेख खूप गाजला. कॅन्सरकडे तटस्थ दृष्टिकोनातून पाहत त्यांनी आपल्या आयुष्याचं नेटकं नियोजन केलं. आपल्या चार पुस्तकांचे प्रकाशन केले. खरा लढवय्या म्हणून डॉक्टरांकडे पाहता येते.

प्राज्ञपाठशाळा वाईचे विश्वस्त, लोकमान्य टिळक स्मारक संस्थेचे अध्यक्ष, राष्ट्रीय कामविज्ञान समितीचे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले. याबरोबरच आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये त्यांनी भाग घेतला. ब्लॉगलेखन, सोशल मीडियावर लेखन, अशा प्रकारे ते सातत्याने व्यक्त होत असत. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

प्रखर बुद्धिप्रामाण्यवादी, नास्तिक्यवादी विचार, असे डॉक्टरांचे आजच्या काळातील एक दुर्मीळ व्यक्तिमत्त्व अनमोल व शब्दातीत आहे. आपल्या बुद्धीला पटलेले सत्य निर्भयपणे ते आयुष्यभर सांगत आणि जगत राहिले. चार्वाकांच्या परंपरेतला एक महान नास्तिकवादी व तर्कनिष्ठ विचारवंत म्हणून त्यांचे इतिहासात एक महत्त्वाचे स्थान राहील. एका विज्ञाननिष्ठ समाजाचे स्वप्न त्यांनी पाहिले होते, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी विवेकवादी चळवळीतील प्रत्येक कार्यकर्ता कटिबद्ध आहे. या शतकातील एक महान वैद्यक व तर्कनिष्ठ विचारवंत आपण त्यांच्या जाण्याने गमावलेला आहे. त्यांची भाषणे, विचार व लेखन यांचे अध्ययन, विश्लेषण, अनुकरण, प्रचार-प्रसार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. त्यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या वतीने अभिवादन !

**डॉ. अरुण शिंदे**
अतिथी संपादक

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

# सत्य-असत्याशी मन केले ग्वाही



**जगदीश काबरे** । सांगली
९९२०१९७६८०

पोटातलं तेच ओठावर आणणारी, थेट बोलणारी माणसे फार कमी असतात. लोक काय म्हणतील? या काळजीत ९० टक्के व्यक्ती आपल्या भावना, विचार दाबून मूळ विषयाला कधीच हात घालत नाहीत. अशी दुहेरी व्यक्तिमत्त्वे घेऊन जगणारी माणसे सध्या सर्वत्र वाढली आहेत. आपण जसे आतून आहोत, आपले जे आतले विचार आहेत ते प्रामाणिकपणे सांगून टाकावेत, त्याचे परिणाम काय होतील त्याची पर्वा करू नये, या माणसांच्या पंक्तीत मी स्वतःला ठेवत आलो आहे. आपल्याला आतून जे सत्य वाटते ते कोणत्याही हितसंबंधांचा विचार न करता फटकन सांगून टाकायचे.

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामानिमित्त राज्यभर फिरत असताना मला सातत्याने एक प्रश्न विचारला जात असे, 'तो म्हणजे तुम्ही देव मानता का हो?' या प्रश्नावर 'देव मानत नाही', असं स्पष्टपणे जाहीर करीत असे. त्यामुळे त्याचे फायदे-तोटे दोन्ही मी सहन केले आहेत. फायदा असा की, देव मानत नाही म्हटले की, बुद्धिस्ट... आणि मूठभर डावे... विवेकवादी आपले मित्र बनतात, पण ८० टक्के लोक आपल्याबाबत पूर्वग्रहदूषित होऊन जातात. देव न मानणारा म्हणजे राक्षस, असूर, अनैतिक, भोगवादी, कशाचीही भीती व बंधन नसणारा स्वैराचारी, अशी प्रतिमा लोकांच्या मनात तयार झालेली असते. लोक त्याच नजरेने पाहतात; व्यवहार करतात. अर्थात, जे दीर्घकाळ आपल्या सहवासात असतात त्यांचे पूर्वग्रह हळूहळू गळून पडतात. पण त्यांची संख्या फार कमी असते.

माणसाच्या जीवनात देवाची, ईश्वराची गरज आहे काय? अर्थात देव, ईश्वर नावाच्या कोणत्या तरी स्वतंत्र घटकाचे (Entity) अस्तित्व मान्य करण्याची, स्वीकारण्याची गरज आहे काय? त्यासाठी स्वतःच्या जीवनाचे सिंहावलोकन केले, की या प्रश्नाचे उत्तर मिळते. साधारणतः वयाच्या तिसाव्या वर्षापासून मी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या संपर्कात आलो. आज पंचाहत्तरी उंबरठ्यावर उभा आहे. या ४० वर्षांच्या काळात माझ्यावर संकटे आली नाहीत असे नाही. हिंसक हल्ला, पोलीस केस, जीवघेणा अपघात, नैराश्य, ताणतणाव, आर्थिक ओढाताण असे सगळे मित्र (!) माझ्या सहवासात राहून गेले; पण मला अशा कोणत्याही संकटकाळात ईश्वराची आठवण झाली नाही. त्याची आठवण केली, धावा केला तर तो काही तरी मदत करेल असे यत्किंचितही वाटले नाही. आपल्या जीवनात देवाची काही भूमिका आहे, असे मला कधीच जाणवले नाही.

बरे, मी काही देवविरोधी वातावरणात, अगदी कम्युनिस्ट घरातही वाढलेलो नाही. याउलट माझ्या कैक पिढ्यांत धार्मिक संस्कार आणि कर्मकांडांचं प्रस्थ होतं. लहानपणी उन्हाळ्याच्या सुट्टीत पोरगं रानावनात उनाडक्या करीत फिरेल म्हणून माझी बोळवण लागोपाठ तीन वर्षे एकेक महिन्यासाठी अध्यात्म प्रशिक्षण शिबिरात करण्यात आली होती. त्याकाळात तोंडपाठ केलेला हरिपाठ, ज्ञानेश्वरीतल्या ओव्या, अभंग, भगवद्गीतेचा अठरावा अध्याय आजही बऱ्यापैकी स्मरतात. माझ्या आरत्या मंत्रपुष्पांजलीसकट पाठ असल्यामुळे अकरावीपर्यंत तर मला गणपती उत्सवाच्या काळात वेगवेगळ्या ठिकाणी आरत्या म्हणण्यासाठी मित्र घेऊन जायचे. असं असतानाही दरम्यानच्या काळात माझ्या वाचनात आगरकर, संत तुकाराम, गाडगे महाराज, प्रबोधनकार ठाकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सत्य हाच ईश्वर मानणारे महात्मा गांधी यांचे साहित्य व त्यांच्यावर लोकांनी लिहिलेली पुस्तके वाचनात आली. त्यामुळे तोपर्यंत माझ्या जीवनातली असलेली ईश्वराची भूमिका संपली आणि नंतरच्या आयुष्यात मला माझ्या जीवनात देवाची भूमिका कुठेच सापडली नाही.

मला अनेकदा असेही प्रश्न विचारले जातात, की कोट्यवधी लोक, शास्त्रज्ञ, डॉक्टर देव मानतात. ते मूर्ख, अन् तुम्हीच तेवढे शहाणे आहात का? मला वाटतं, परिस्थितीला शरण जाणं आणि डोकं खाजवूनसुद्धा काही प्रश्न अनुत्तरित राहिले, की, अशा माणसांना ईश्वराच्या उचक्या लागायला लागतात. शिक्षणाने माणूस विज्ञानाचे

काही प्रयोग, संशोधन करून शास्त्रज्ञदेखील होतो. पण जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील समस्या, प्रश्न, शंका याचे समाधान तर्कशुद्ध पद्धतीने प्राप्त करण्याचा वैज्ञानिक दृष्टीकोन त्याच्यात निर्माण होईलच असे नाही. तसेच लहानपणापासून त्याच्या डोक्यात देवाधर्माचे जे संस्कार घट्ट रुजवले जातात त्यांच्याबद्दल शंका निर्माण झाल्या, प्रश्न पडले तरी तर्कशुद्ध पद्धतीने त्यांची उत्तरे मिळवून ते धसास लावण्याचे धाडस त्याच्यात नसते. कारण समाजात एकटे पडू, कळपाच्या बाहेर पडू, अशी असुरक्षिततेची भीती त्याला वाटत असते. म्हणून त्याला शिक्षणामुळे हे जरी नक्की माहीत असले की, ऊर्जा निर्माणही होत नाही आणि नष्टही होत नाही, पण तरीही बाबाने हवेतून काढलेल्या वस्तू पाहून तो त्या बाबाच्या तथाकथित चमत्काराला बळी पडतो. अनामिक ऊर्जेने ते शक्य होते अशा तर्कदुष्ट छद्मविज्ञानाने तो स्वतःचे समाधान करून घेतो. परंतु ऊर्जेला भावना नसतात, अमुक व्यक्तीवरच कृपा करणारी अशी ती पक्षपाती नसते, असा तर्क त्याच्या मनालाही शिवत नाही. त्यामुळे धर्ममार्तंड सकारात्मक आणि नकारात्मक ऊर्जेबद्दल जे बोलतात ते भान हरपून तो ऐकतो. कारण एकच – वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव! तीच गत एखाद्या डॉक्टरचीही होऊ शकते. त्याला मूल कसे जन्मते याची पूर्ण शास्त्रीय माहिती असते, तरीही तो विनापत्य स्त्रियांना हमखास अपत्य देणाऱ्या बाबाच्या कच्छपी लावतो – कारण वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव!

श्रद्धा, भावना, अध्यात्म यांचं एक विराट मार्केट आपल्याकडे तयार झालं आहे. त्यासाठी आपल्या मेंदूवर अंधश्रद्धेच्या जळमटांचे थर चढवायचे मार्केटिंगचे तंत्र देखील विकसित झाले आहे, हे कबूल केले पाहिजे. कडू गोळ्यांना साखरेचे आवरण लावले की लोकांना त्या पचतात. अशा परिस्थितीत त्या गुणकारी कडू औषधाचे अस्तित्व कळत नाही. त्या आवरणाचे कार्य ईश्वर नावाची संकल्पना समाजाच्या जीवनात करते, असे स्वामी विवेकानंद सांगायचे. 'देव त्याचीच मदत करतो, जो स्वतःच स्वतःची मदत करतो', असं जे प्रसिद्ध विधान स्वामी विवेकानंद करतात, याचा अर्थ खूप व्यापक आहे. 'प्रयत्नांती परमेश्वर' अशी एक म्हण आहे. 'प्रयत्न करा, म्हणजे यश मिळेलच', असा या म्हणीचा खरा अर्थ आहे. हा प्रेरक अर्थ देणारे महापुरुष मोजता येणार नाहीत एवढ्या संख्येने आपल्यात होऊन गेले. त्यांनी लौकिक व्यवहारात हस्तक्षेप करणारे नशीब आणि ईश्वर असे दोन्ही नाकारून थेट प्रयत्नांचे महत्त्व सांगितले. पण व्यवहारातील अपयशाने निराश होणाऱ्यांसाठी त्याचे खापर फोडायला नशीब आणि ईश्वराची आभासी व्यवस्था केली गेली. या आभासी व्यवस्थेत व्यक्ती आणि परमेश्वर यांच्यात थेट व्यवहार झाला तर माझ्या हितसंबंधांचे काय? असा विचार या व्यवस्थेतील दलाल करतात आणि त्यांनीच पुढचा हा सारा अनर्थ आपल्या प्रत्येकाच्या जीवनात करून ठेवला आहे.

जेव्हा मी नास्तिक्याकडे वळत होतो आणि घरात कर्मकांडाच्या विरोधात बोलत होतो तेव्हा माझे आई-वडील म्हणाले की, ''तू आता मोठा झाला आहेस. तुझे विचार आम्हाला कळतात, पण आमच्या लहानपणापासून हे आमच्यावर असेच संस्कार झाले आहेत. त्यामुळे आम्ही काही आता बदलू शकत नाहीत. तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्य म्हणून तू तुझा कसाही वागायला मुक्त आहेस.'' याच पद्धतीने मीही मान्य केले की, त्यांचे व्यक्तिस्वातंत्र्य म्हणून तेही त्यांच्या पद्धतीने जायला मुक्त आहेत. ह्यात मी त्यांना नास्तिक बनवू शकलो नाही याचे मला दुःख वाटत नाही. खरे तर त्यांनी तेच संस्कार माझ्यावरही केलेले होते. परंतु मी सत्याशी प्रामाणिक राहून प्रयत्नपूर्वक त्यातून बाहेर पडलो.

मुळात विवेकवादी नास्तिक होण्याची प्रक्रिया ही एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. कारण लहानपणापासून आपण ज्या धर्मात जन्मलो आहोत त्याचे संस्कार आपले आईवडील सतत करत असतात आणि लहानपणी झालेले संस्कार जोपर्यंत तुम्ही स्वतः विचार करून स्वतःशी झगडून बदलत नाही तोपर्यंत ते बदलणे कठीण! पण अशाप्रकारे विचार करणारी किती मंडळी असतात? समाजात चालत आलेल्या रीतिरिवाजांच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी अंगी धाडस लागते. असे धाडस सगळ्यांच्याच अंगी असते असे नाही. असे बरेच लोक असतात की, ज्यांना समाजातील घातक रूढी-परंपरा आवडत नाहीत. पण त्याविरोधात बोलायला त्यांची जीभ रेटत नाही. कारण पदोपदी समाजाच्या विरोधात जाताना होणाऱ्या संघर्षाला सामोरे जायचे धाडस त्यांच्यात नसते. त्यापेक्षा 'यामुळे आपले काही नुकसान होत नाही ना' असा कातडीबचाऊ विचार करून ते गप्प राहणे पसंत करतात. सगळ्यांनाच असे गप्प राहणे जमत नाही.

जे पदोपदी सत्य-असत्याला आपले मन साक्षी

**(पृष्ठ क्रमांक ९ वर )**

# परिवर्तनाचे वाटसरू : कृष्णाजी कर्काजी चौधरी



**डॉ. गोविंद काळे** । लातूर
९८२३८४३४९६

'सत्यशोधक समाज' स्थापनेला दीडशे वर्षे पूर्ण झाली आहेत. या जनचळवळीने तत्कालीन बहुजन समाजास परिवर्तनाच्या नव्या दिशा दाखविल्या. स्त्री, शूद्र, बहुजनांच्या अधोगतीस त्यांचे अज्ञान कारणीभूत असल्याचे सांगून ब्राह्मणांचा दुटप्पीपणा सप्रमाण जगासमोर मांडला. याशिवाय सत्यशोधकी साहित्य निर्माण करून आधुनिक मराठी साहित्यात अनेक प्रवाह रूढ करण्याचे श्रेयही सत्यशोधकांना द्यावे लागते. तत्कालीन भाषांतरित, रूपांतरित साहित्यनिर्मितीऐवजी सत्यशोधकांनी अस्सल देशी अभिव्यक्ती तंत्रांचा वापर करून दर्जेदार साहित्य निर्माण केले हे विशेष आहे. साहित्यातून समाजास परिवर्तनाचा मार्ग सुचविता येतो, त्यानुसार वाटचाल करता येते हे त्यांनी सिद्ध करून दाखविले. महात्मा फुले यांच्या लेखन आणि कार्यातून प्रेरणा घेऊन पुढील काळात अनेक सत्यशोधक लिहिते झाले. कृष्णाजी कर्काजी चौधरी त्यापैकीच एक होत. सत्यशोधक विचार वऱ्हाड प्रांतात रुजविण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक लेखन केले. समाजपरिवर्तनाच्या मार्गावरील ते महत्त्वाचे वाटसरू होते. इथे त्यांनी लिहिलेल्या 'भाग्यवान सुशीला अथवा विवाहविषयक सत्यशोधक मार्ग' या नाटिकेची वर्तमानकालीन प्रासंगिकता थोडक्यात समजून घेऊ.

वऱ्हाड प्रांतातील करजगाव येथील सत्यशोधक कृष्णाजी कर्काजी चौधरी लिखित 'भाग्यवान सुशीला अथवा विवाहविषयक सत्यशोधक मार्ग' ही नाटिका 'दीनमित्र' साप्ताहिकातून २६ डिसेंबर १९२८ ते ३० जानेवारी १९२९ या कालावधीत क्रमशः प्रसिद्ध झाली आहे. नाटिकेस चार वर्षांनी शंभर वर्षे पूर्ण होतील तरीही त्यातील आशयाची प्रासंगिकता आजही संपलेली नाही, हे प्रस्तुत नाटिकेच्या वाचनातून सहज लक्षात येते. विधवाविवाह आणि लग्न समारंभात केला जाणारा अतिरेकी खर्च कमी करण्यासाठी सुचविलेला सत्यशोधक विवाहपद्धतीचा व्यवहार्य मार्ग, ही प्रस्तुत नाटिकेची वैशिष्ट्ये आहेत. तत्कालीन समाजजीवनात ब्राह्मणांकडून पंचांग, तिथी, मुहूर्त पाहून लग्नं जमवली जात. ही पद्धत आजही रूढ असल्याचे खेदाने मान्य करावे लागते. प्रस्तुत नाटिका वरील थोतांड नाकारते. सत्यशोधक पद्धतीने विवाह लावण्याचे फायदे सांगून शिक्षण तसेच अनुरूप जोडीदाराची निवड याचा आग्रह धरते.

प्रस्तुत नाटिकेतील भास्कर हा नायक नागपूरच्या हिस्लॉप महाविद्यालयातून बी. ए. उत्तीर्ण झाला आहे. तो अरुणवाडी येथील जयसिंग पाटील यांचा मुलगा. एक दिवस सायंकाळी आपल्या गावी पायी परतत असताना रात्री उशीर झाल्यामुळे तो अनंतपूर येथे भुजंगराव देशमुख यांच्या घरी मुक्कामी राहातो. भुजंगराव, त्यांची पत्नी सगुणाबाई आणि त्यांची शिक्षित बालविधवा तरूण मुलगी सुशीला असे त्यांचे कुटुंब असते. या मुक्कामी भास्कर आणि सुशीला यांची ओळख होते. उभयता एकमेकांस अनुरूप असल्याची जाणीव होते. सुरुवातीला पुराणमतवादी भुजंगराव सुशीलेच्या पुनर्विवाहास अनुकूल नसतात.

नाटिकेचे कथानक पुढे जात राहते तसा त्यात सुशीलेचा संवाद येतो.

सुशीला - मला ह्या जगात प्रेमाचा सांगाती नको काय गं, मायबाई? पुरुष जातीने बायकोवाचून राहू नये! पहिली मेली तर दुसरी करावी, दुसरी मेली तर तिसरी, चौथी, पाचवी करावी. एक बायको जिवंत असूनसुद्धा तिच्या उरावर दोन - दोन, तीन - तीन किंवा याहीपेक्षा जास्ती बायका कराव्यात आणि आपल्या लोकांत बायकांविषयी एवढा निष्ठूरपणा! आई, मी तुझ्या पोटचा गोळा ना? तूच विचार कर. मी तर मुकी गाय. सुशीलाने केलेला वरील जळजळीत युक्तिवाद आणि सुधारकी विचारांच्या सगुणाबाई यांच्यामुळे भुजंगरावांचे मतपरिवर्तन होते. याकामी नाटिकेतील शाळा मास्तर, व्याख्याते - १ आणि २ ही अन्य पात्रे मदत करतात. शेवटी दोन्ही कुटुंबांच्या सहमतीने भास्कर आणि सुशीला यांचा सत्यशोधक पद्धतीने विवाह संपन्न होतो.

प्रस्तुत नाटिकेचा दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे पारंपरिक विवाहपद्धतीमुळे होणाऱ्या अपरिमित खर्चास आळा घालण्यासाठी सुचविलेला सत्यशोधक विवाहपद्धतीचा सुकर आणि सुलभ मार्ग होय.

व्याख्याता पहिला – लग्नात वाजवीपेक्षा फाजील खर्च केल्याने आपली शेकडो घराणी धुळीस मिळाली आहेत. करिता माझी या सभेस हात जोडून विनंती आहे की, लग्ने अगदीच कमी खर्चात केली जावीत. मला तर वाटते, कोणतेही लग्न एक रुपयात होऊ शकते. फार फार झाले तर लग्नानिमित्त होणारा खर्च २५ रुपयांपेक्षा जास्त नसावा. अनुभव पाहिजे असल्यास थोड्या खर्चात लग्न कसे उरकावे ती पद्धत दाखवून देतो.

अगदी एक रुपयात सत्यशोधक पद्धतीने विवाह लावणे त्याकाळी शक्य होते. ब्राह्मणी व्यवस्थेने अतार्किक, भरमसाठ लग्नविधी सांगून सहज दानदक्षिणा उपटण्याची केलेली सोय सत्यशोधकांना कधीच मान्य नव्हती. परिणामी, सत्यशोधक विवाहपद्धत समाजमनात मूळ धरू लागल्याचे पाहून दक्षिणा बुडाल्याचे बरेच खटले भटांनी त्याकाळी कोर्टात चालविल्याचे पुराव्यानिशी सांगता येईल. एकूणच घरात लग्नकार्य निघाले की शेतजमिनी गहाण ठेवून, कर्जबाजारी होऊन प्रसंगी कित्येकांनी आपली जीवनयात्रा संपविल्याचे आजही आपल्या अनुभवास येते. केवळ लग्नासाठी लागणारा खर्च आईवडिलांना झेपत नसल्यामुळे कितीतरी मुली आजही अविवाहित जीवन कंठत असल्याचे दिसते. बऱ्याच मुलामुलींचे लग्नाचे वय वाढत जाते. अशा कितीतरी व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक समस्यांच्या मुळाशी असलेली पारंपरिक विवाहपद्धत कायमची बंद होऊन तिथे सत्यशोधक विवाहपद्धत रूढ व्हावी, या हेतूनेच कृष्णाजी कर्काजी चौधरी यांनी प्रस्तुत नाटिका त्या काळी लिहिलेली असली तरी तिची प्रासंगिकता आजही तशीच आहे, हे सुद्धा इथे लक्षात घेण्यासारखे आहे.

'विवाह' ही जीवनातील आवश्यक प्रक्रिया आहे. समाजाच्या अस्तित्वासाठी, कुटुंबसंस्था टिकविण्यासाठी स्त्रीपुरुषांनी एकत्र येणे ही एक नैसर्गिक गरज आहे. विवाहसंस्थेमुळे या नात्यास सामाजिक मान्यता प्राप्त होते. विवाहामुळे दोन व्यक्तींबरोबर दोन कुटुंबेही एकमेकांशी जोडली जातात. परिणामी या प्रक्रियेत मुलामुलींच्या मूक संमतीऐवजी त्यांचा सक्रिय सहभाग विशेष आवश्यक आहे. मुली शिकल्या की त्यातून त्यांचे स्वावलंबन विकसित होत जाते. आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या मुलींना आपल्यासाठी अनुरूप जोडीदार निवडणे सहज शक्य असते. त्याच्या जोडीला विवाहप्रसंगी कराव्या लागणाऱ्या अनावश्यक खर्चास कात्री लावून दोन्ही कुटुंबांची आर्थिक स्थिती उत्तम राखता येते. असे कितीतरी मूलभूत विषय प्रस्तुत नाटिकेतून मांडले गेले आहेत.

सगुणाबाईसारखी पारंपरिक जीवन जगणारी गृहिणी आपल्या मुलीच्या पुनर्विवाहासाठी लढत असल्याचे चित्र रंगवून नाटककार समकालीन स्त्रीमनावर सत्यशोधक विचारांचा सकारात्मक परिणाम होत असल्याचे सूचित करतो. भास्करसारख्या सुशिक्षित तरुणांनी पुढाकार घेऊन अशी लग्ने करावीत असेही नाटककारास सूचित करावयाचे आहे. जयसिंग पाटील आणि भुजंगराव देशमुख ही पात्रे नाटकातील केवळ व्यक्तिरेखा नसून समाजमनाचे प्रतिनिधी म्हणून पुढे येतात. पारंपरिक जीवनपद्धतीचा प्रभाव असलेली ही घराणी बदलत्या काळानुसार बदलत असून नवा सुधारकी विचार हसत हसत स्वीकारत असल्याचे चित्र रंगवून नाटककार समाजास बदलण्यासाठी प्रेरित करतो. इथे भास्कर आणि सुशीला यांनी उभयता एकमेकांना पसंत करणे ही बाब विशेष महत्त्वाची आहे. सुशीला बालविधवा असल्याचे माहीत असूनही भास्कर तिला पत्नी म्हणून स्वीकारतो. प्रस्तुत नाटिकेचा कालखंड शंभर वर्षांपूर्वीचा आहे हे लक्षात घेतल्यास भास्कर आणि सुशीला यांच्या धाडसाचे महत्त्व पटते. शिक्षणाने समज येते; पण ती आपल्या वर्तनातून दिसायला हवी. सत्यशोधकांना अपेक्षित असलेल्या सुशिक्षित, सुदृढ समाजाचे ते प्रतिनिधी आहेत.

सत्यशोधक लेखक प्रथम कार्यकर्ते असल्यामुळे त्यांचे लेखन आणि कार्य वेगळे करता येत नाही. कृष्णाजी कर्काजी चौधरीही त्यापैकीच एक. महात्मा फुलेंनी सत्यशोधक विवाहपद्धत सांगितली. इतर सत्यशोधकांनी ती सर्वदूर पोहोचवली. त्याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून प्रस्तुत नाटिकेकडे पाहाता येईल. समकालीन समाज बदलाच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे, हे सूचित करणाऱ्या व्यक्तिरेखा त्यांनी जाणीवपूर्वक उभ्या केल्या. सर्वसामान्यांना आपल्याशा वाटणाऱ्या या व्यक्तिरेखा सत्यशोधक दूत म्हणूनच नाटकात वावरत असतात.

समाजजीवनात प्रत्यक्ष काम करत असताना ज्या घटना, प्रसंग सत्यशोधकांनी अनुभवले तेच त्यांनी आपल्या लिखाणातून मांडले. परिणामी, त्यांना कधीही कल्पनेचा आधार घेण्याची गरजच पडली नाही, हे त्यांचे इतर समकालीन नाटकांपेक्षा ठळक दिसणारे वेगळेपण लक्षात घ्यायला हवे.

प्रस्तुत नाटिकेचा आकार अगदीच लहान असला तरी गुणात्मकदृष्ट्या तिचे प्रभावमूल्य अधिक आहे. साहित्यातून समकालीन समाजाचे प्रतिबिंब उमटावे हे जितके आवश्यक तितकेच साहित्याने समाजास दिशादर्शक ठरतील अशी मूल्ये प्रसृत करावीत हेही गरजेचे असते. परिवर्तनवादी साहित्य केवळ 'कलेसाठी कला' या भूमिकेतून लिहिले जात नाही. सत्यशोधकी साहित्यही याला अपवाद नाही. प्रस्तुत नाटिकेच्या निमित्ताने कृष्णाजी कर्काजी चौधरी यांनी उच्चकोटीची सामाजिक बांधिलकी स्वीकारून परिवर्तनाच्या प्रदीर्घ परंपरेचे पाईक असल्याचे सिद्ध केले आहे. प्रस्थापित शोषणाची संपूर्ण यंत्रणा मुळातून उलथून टाकण्याच्या दृष्टीने प्रस्तुत नाटिका आजही बहुजनांचे आत्मभान जागे करणारी ठरते. विवाहादी समारंभांच्या निमित्ताने होणारा भरमसाठ खर्च वाचविण्याचे तरुणाईने मनावर घेतल्यास या कामी प्रस्तुत नाटिकेतील उपाय नक्कीच उपयोगी पडतील. शिवाय जोडीदाराची विवेकी निवड करण्याचे स्वातंत्र्य तरुणांना असायला हवे हा तत्कालीन समाजनियमांनुसार क्रांतिकारक ठरणारा विचार आजही तितकाच प्रासंगिक आहे, हे सहज लक्षात येते. दर्जेदार साहित्याच्या वाचनातून वर्तमानात प्रगतिपथावर मार्गक्रमण करण्याचे बळ प्राप्त होते, हे नक्की. जोडीदाराची विवेकी निवड करू पाहाणाऱ्या तरुणांनी प्रस्तुत नाटिका नक्की वाचायला हवी, इतकेच मला इथे सुचवायचे आहे. साधारण शंभर वर्षांपूर्वी लिहिली गेलेली ही नाटिका आधुनिक मराठी नाट्यक्षेत्रातील मैलाचा दगड आहे, हे मान्य करावे लागते.

**संदर्भ-भाग्यवान सुशीला अथवा विवाहविषयक सत्यशोधक मार्ग**
**लेखक - कृष्णाजी कर्काजी चौधरी**
**संपादक-सतीश जामोदकर, सुगम प्रकाशन, अमरावती,**
**पुनर्मुद्रण - २४ सप्टेंबर २०१८.**

●

---

**(पृष्ठ क्रमांक ६ वरून)**

(ग्वाही) ठेवत असतात आणि म्हणून तेच तेवढे बदलतात. मी देव मानत नाही म्हणून कुणाचंही लक्ष नसताना चोरी करण्याची इच्छा होत नाही. पाप-पुण्य सगळं झूट आहे म्हणून अनैतिक कार्याकडे झेपावत नाही, की रस्त्यावर पोलीस नाही म्हणून सिग्नल तोडावासा वाटत नाही. कारण मी जे करतो त्याच्या यशापयशाची जाबाबदारी मीच उचलतो आणि आत्मपरीक्षण करून कुठे बहकलो ते शोधून पुन्हा ती चूक न करण्याची खबरदारी घेतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी स्वतःशी प्रामाणिक राहतो आणि जग काय म्हणेल याचाही विचार करत नाही. उलट जे अहोरात्र देव-देव करतात त्यांनी नीतीशी फारकत घेतल्याचे, पुजाऱ्यांनी भक्ताला लुटल्याचे, बलात्कार केल्याचे मी पाहतो, त्या वेळी माझ्या जीवनात देवाला स्थान नसल्याबद्दल समाधान वाटते. थोडक्यात काय तर, नीतिमत्तेने वागण्यासाठी देवाधर्माची आवश्यकता नसते. व्रत-वैकल्ये, कर्मकांडी कुळाचार, पूजाअर्चा या प्रथा धार्मिकतेमुळे आलेल्या असतात. मात्र नीतीने वागण्यासाठी विवेकी विचारांची गरज असते. कोणताही बदल स्वीकारण्यासाठी अंगी धाडस लागते आणि विचार करण्याची प्रवृत्तीही. जोपर्यंत तुम्ही ती जोपासत नाही तोपर्यंत तुमचे जिणे हे मेंढरू वृत्तीच्या प्रवाहपतितासारखे गलितगात्र होते. तुम्हाला बिनडोक मेंढरू व्हायला आवडेल की वैचारिक माणूस, हे तुम्हीच ठरवायचे आहे. त्यासाठी देवाच्या, अल्लाच्या किंवा गॉडच्या भीतीने चांगले वागणे नैतिक की, स्वतःशी प्रामाणिक राहून नीतिमत्तेने वागणे चांगले? तुम्हाला काय वाटते?

**(लेखक परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते व साहित्यिक आहेत.)**

●

# खरंच, नशीब असतं का?



**जितेंद्र रायपुरे** । गडचिरोली
८८०६५५०९२०

मी एका मित्रासोबत किशोरला भेटायला किशोरच्या घरी गेलो. किशोर घरात आतमध्ये होता. गेट आमच्याकडून काही उघडत नव्हते. किशोर बाहेर आला. त्याने गेट उघडलं आणि आम्ही तिघे पोर्चकडे निघालो. पावसाचे दिवस असल्याने थोडी काई (हिरवळ, शेवाळ) अंगणात जमली होती. किशोर त्यावरून घसरून खाली पडला. तो स्वतःच उठला आणि उद्गारला, नशीब! डोक्यावर पडलो नाही!

नशीब? तसे पाहता मी आणि माझे मित्र त्याच्या अंगणात पडलो नाही म्हणून आमचं नशीब चांगलं म्हणायला पाहिजे. वेगवेगळ्या प्रसंगी असे आपण नेहमी नशीब, नशीब करत असतो. समजा, किशोर डोक्यावर पडला असता आणि थोडा मार लागला असता, तर तो म्हणाला असता, 'नशीब चांगले, जास्त मार लागला नाही, जखम झाली नाही'. पण मोठी जखम झाली असती आणि दवाखान्यात भरती करून उपचार करावा लागला असता तर पुन्हा म्हणाला असता, 'नशीब चांगले, एवढा मार लागूनही कोमात गेलो नाही'. फारच मोठी जखम झाली असती नि तत्काळ ॲम्ब्युलन्सने अतिदक्षता विभागात भरती करून त्याचा जीव वाचवावा लागला असता; विज्ञान आणि तंत्रज्ञान याचा फायदा घेऊन पाच-दहा लाख रुपये खर्च करून तो सुखरूप घरी आल्यावर म्हणाला असता, 'पैसे गेले पण नशीब चांगले होते म्हणून जीव वाचला'. बऱ्यावाईट घटनांचे बरेवाईट परिणाम आपण नशीब या संकल्पनेशी जोडून मोकळे होताना आपण त्या घटनाही आणि त्यांचे परिणामही अटळ असतात हे नकळतच स्वीकारत असतो आणि त्यांचे तर्कशुद्ध विश्लेषण टाळत असतो, त्यातून येणाऱ्या जबाबदाऱ्या टाळत असतो. उदा. नशिबाला दोष देत पावसाळ्यात अंगणात शेवाळ होणार नाही, जाण्यायेण्याचा रस्ता निसरडा होणार नाही, जपून चालले पाहिजे अशा जबाबदाऱ्या किशोरने नकळत दुर्लक्षित केल्या.

वेगवेगळ्या धर्मांमध्ये नशीब ही संकल्पना आलेली आहे. सर्वच धर्मांनी जीवनाचा, त्यातील घटनांचा अर्थ शोधण्याचा, त्यांचा अर्थ लावण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केलेला दिसून येतो. ज्यांचा अर्थ कोणत्याही प्रकारे कळत नाही, कोणताही कार्यकारणभाव दिसून येत नाही, किंवा लक्षात येत नाही, त्या ठिकाणी 'नशीब' या एका अमूर्त घटकाची योजना त्यात करण्यात आली आणि नशीब या घटकाची व्याख्या अशी की, कोणत्या तरी अदृश्य शक्तीने व्यक्तीच्या जीवनात किंवा सृष्टिचक्रात आधीच नियोजित केलेल्या घटना आणि त्यांचे परिणाम. या घटना आणि त्यांच्या परिणामांबाबत त्या अदृश्य शक्तीला काही प्रतिप्रश्न, जाब विचारण्याची अर्थातच काही सोय नाही. नशिबाशी जोडलेल्या घटना, परिणाम यांची संख्या आणि व्याप्ती या मानवी मेंदूच्या कल्पकतेइतकी आहे. अगदी डोळ्याची पापणी लवण्याचा किंवा वाऱ्याची झुळूक येण्याचा संबंध देखील एखादी व्यक्ती नशिबाशी जोडू शकते.

सचिन तेंडुलकरने एक दिवसीय सामन्यात १८ हजारांपेक्षा जास्त धावा काढल्या. तसेच त्याने कसोटी सामन्यात पंधरा हजारांपेक्षा जास्त धावा काढल्या. हे त्याच्याच बाबतीत कसे घडले? जिद्द, चिकाटी, रोजचा सराव आणि मेहनत या गोष्टींमुळे त्याने शंभर शतके करून भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजविले. आता कोणी असे म्हणेल, 'त्याच्या नशिबात होते, नशिबाची साथ होती, म्हणून तो एवढे पराक्रम करू शकला'. मग जर नशिबामुळेच शक्य होत असेल तर त्याचे कार्य, कर्तृत्व शून्य ठरते.

दैनंदिन जीवनातील अशी अनेक उदाहरणे देता येतील की, आपण नशीब हा शब्द सररास वापरत असतो. मूल जन्माला आल्यानंतर मोठे होत जाते तसे नशीब, भाग्य, संचित, प्रारब्ध, दैव, दुर्दैव असे शब्द त्याच्या मनात या ना त्या प्रसंगांच्या निमित्ताने कोरले जात असतात. त्याची ती स्वीकारण्याची एक मानसिकता तयार होते. ही मानसिकता संपूर्ण समाजाची झाली की ती एक सामाजिक मान्यता बनते.

**(पृष्ठ क्रमांक १७ वर)**



# लैंगिकता शिक्षणाचे टप्पे

**सचिन थिटे ।** मुंबई
८४२४०४११५९

लैंगिकता शिक्षणाची कशी आवश्यकता आहे याबाबत मागील महिन्यातील लेखात आपण जाणून घेतले. लैंगिकता शिक्षणासंदर्भात अनेक पालकांच्या मनात हा प्रश्न सतत असतो की, आपल्या मुलांशी या विषयावर बोलण्याची सुरुवात नेमकी कधी आणि कशी करावी? तर यासाठी आधी एक पक्के लक्षात घ्यावे लागते की, लैंगिकता शिक्षण हे एका दमात देऊन मोकळे होण्यासारखे नाही. शाळेतील किंवा कुठल्या शिबिरातील एक दोन सत्रांमधूनसुद्धा हे शिक्षण पूर्ण होण्यासारखे नसते. यासाठी मुला-मुलींशी सातत्याने बोलत राहून वयानुसार, त्या त्या वयातील गरज व समजेनुसार आवश्यक ती माहिती देणे व संवाद होणे गरजेचे असते. यामध्ये प्रामुख्याने पालकांची भूमिका खूप महत्त्वाची असते.

अगदी लहान वयापासूनच मुला-मुलींना स्वतःच्या आणि इतरांच्या लैंगिक अवयवांविषयी कुतूहल असते. कारण 'मुलांचे शिश्न' आणि 'मुलींची योनी' हे अवयव सोडले तर बाकी सर्व अवयव लहानपणी मुलांना सारखेच दिसत असतात; त्यामुळे याच अवयवांविषयी त्यांच्या मनात खास कुतूहल राहाणे साहजिक असते. जसे, लहान मुलं त्यांना पहिल्यांदाच दिसणारी प्रत्येक गोष्ट चाचपून बघण्याचा, स्पर्श करण्याचा प्रयत्न करत असतात, अगदी तसंच याबाबतीतही होत असतं. पण याबाबत पालक व आजूबाजूच्या नातेवाईकांकडून त्यांना मिळणारा प्रतिसाद, वागणूक ही त्यांना खूप गोंधळात टाकणारी असते. मुलांनी अगदी स्वतःच्या शिश्न किंवा योनीला जरी हात लावला तरी पालक त्यांना त्यावरून ओरडत किंवा हातावर फटके देत. छी, गंदा, घाणेरडा, घाणेरडी असे म्हणत असतात. यातून त्यांना नेमकं कळत नसतं की, 'मी असं काय वेगळं केलं, ज्यामुळे एवढा ओरडा किंवा फटका खावा लागला?' शिवाय याचवेळी हा अवयव म्हणजे 'घाणेरडी जागा' आहे असं त्यांच्या मनात बसत जातं व इथूनच सगळं चुकायला सुरुवात होते.

इथं सगळ्यात पहिल्यांदा आपण एक लक्षात घेतले पाहिजे की, लहान मुलांना जसं पाण्याच्या नळाविषयी 'यातून पाणी कसं येतं?' अशा प्रकारचे कुतूहल असतं; अगदी तसंच आपल्या या शिश्न किंवा योनीच्या जागेतून जेव्हा शू बाहेर पडते, तेव्हा त्यांना त्याविषयी अधिक कुतूहल वाटायला लागते. इथून असं कसं पाणी बाहेर येतं? म्हणून देखील ते अनेकदा शिश्न किंवा योनीला हात लावत असतात. शी करत असताना सुद्धा अनेकदा लहान बाळे त्याकडे वाकून वाकून बघत त्याचे निरीक्षण करत असतात. हे सुद्धा याच कुतुहलातून येत असते. त्यात जेव्हा लहान मुलगा व मुलगी एकमेकांचे शिश्न व योनी पाहातात, तेव्हा आपली शू ची जागा व याची/हिची शू ची जागा वेगळी कशी? याचे त्यांना अजून कुतूहल वाटते. त्यावेळी त्यांना आपल्या शिश्न/योनी सोबतच समोरच्याच्या योनी/शिश्नालासुद्धा हात लावून बघण्याची जिज्ञासा वाढते. शिवाय आपले शिश्न किंवा योनी घरातील इतर सर्व माणसे बघतात, पण त्यांचे मात्र आपल्याला कधीच दाखवत नाहीत हेसुद्धा मुला/मुलींना जाणवत जाते. अगदी आईच्या ज्या स्तनांतून आपण दूध पीत होतो, अचानक ते सुद्धा आपल्यापासून लपवले जाते. शिवाय असे स्तन (माम माम) फक्त आईलाच का आहे? बाबाला का नाही? असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात येत असतात. मग अशा वेळी त्यांना आपल्या आई-वडील किंवा घरातील इतरांचे सुद्धा स्तन, शिश्न/योनी, गुदद्वार पाहायचे असते. त्याकरिता ते अनेकदा वेगवेगळ्या पद्धतीने आटापिटा करतात आणि मग अनेकदा फटकेसुद्धा खातात.

खरंतर या सगळ्या जिज्ञासा, कुतूहल हे खूप सहज, नैसर्गिक व मुलांना या जगाची ओळख करून देणारे असते; ओळख करून घेण्यासाठी त्यांची धडपड असते. शिवाय या वयात स्वतःच्या लैंगिक अवयवांना हात लावताना मुलांना आनंदसुद्धा मिळत असतो. पण त्यात लैंगिक भावना अजिबात नसते. याचवेळी जर आपण त्यांना समजेल अशा भाषेत त्यांच्याशी बोललो आणि

त्यांना याविषयी अधिक माहिती स्वतःहून दिली तर त्यांना हे समजून घ्यायला अधिक मदत होते. आपण जर त्यांच्या जागी जाऊन त्यांच्या मानसिकतेतून विचार केला तर या गोष्टी त्यांच्यासाठी किती सहज व महत्त्वाच्या आहेत हे आपल्याला लक्षात येईल. खरेतर मुलांमध्ये असे कुतूहल जेव्हा जागे होईल तेव्हाच त्यांना या शी, शू च्या जागा, आईला दूध येण्याची जागा, त्यांची नावे, त्यांची कार्ये व मुला-मुलींमध्ये असणारे हे वेगवेगळे अवयव यांविषयी त्यांच्याशी त्यांना समजेल अशा भाषेत बोलत राहायला हवे. कधीकधी मुलांनी स्वतःहून नाही विचारलं तरीही पालकांनी स्वतःहून याविषयी त्यांच्याशी संवाद साधून त्यांना ही माहिती द्यायला हवी. आणि त्यानंतर आपले काही विशिष्ट अवयव आपण झाकून ठेवायचे असतात व इतरांना ते दाखवायचे नसतात आणि इतरांचे पाहायचे पण नसतात हे सुद्धा त्यांना समजावून सांगायला हवे. यामुळे एकतर त्यांना मिळालेल्या या माहितीमुळे त्यांच्या मनातील कुतूहल कमी होते व त्यांच्या मनातील अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांना मिळत जातात. शिवाय या अवयवांविषयी त्यांच्या मनात तिरस्काराची किंवा घाणेरडी भावनासुद्धा येत नाही. तसेच आपण याविषयी काही प्रश्न आपल्या मनात आले तर आई-बाबांशी बोलू शकतो हा विश्वास त्यांच्या मनात तयार होतो. पुढे होऊ शकणाऱ्या बाललैंगिक शोषणासारख्या प्रकारांपासूनसुद्धा आपण अशा शिक्षणामुळेच मुलांना वाचवू शकतो. कारण बाललैंगिक शोषणाचे प्रकार हे अगदी तीन वर्षांपासून ते दहा वर्षांपर्यंतच्या मुलामुलींच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे हे आपण अगदी गांभीर्याने घ्यायला हवे आणि त्यासाठीच लैंगिक अवयवांची माहिती व त्यांची शास्त्रीय नावे मुला-मुलींना शिकवली गेली पाहिजेत. पण अर्थातच यासाठी आधी पालकांना स्वतःसाठीच काम करून त्याबाबत अधिकाधिक जाणून घ्यावे लागेल. आपली स्वतःची माहिती व दृष्टिकोन स्पष्ट असेल तरच मुलामुलींना याबाबत शिक्षण देण्याचे हे काम निःसंकोचपणे करता येऊ शकते. नाहीतर पुन्हा यातून आपल्याकडूनच त्यांच्याकडे चुकीची माहिती किंवा चुकीचा दृष्टिकोन दिला जाण्याची पण शक्यता आहेच.

लहानपणीच योग्य माहिती न मिळाल्याने व तसे वातावरण घरात किंवा आजूबाजूला नसल्याने या वयात केले गेलेले हे लैंगिक अवयवांविषयीचे कळत-नकळतचे चुकीचे संस्कार पुढे आयुष्यभर तसेच राहाण्याची शक्यता अधिक असते आणि त्यातून मुला-मुलींना पुढे अनेक मानसिक कुचंबणा, गोंधळ, गैरसमजांना व कधी काही समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणूनच मुलांना योग्य वयात योग्य माहिती देण्यासाठी मुलांच्या आधी पालकांचे लैंगिकता शिक्षण होणे खूप गरजेचे आहे. आपल्या लैंगिक अवयवांसंबंधी पालकांना आधी योग्य माहिती व योग्य दृष्टीकोन असेल तरच ते मुलांपर्यंत पोहोचवू शकतात. पण बहुतांशी पालकांनासुद्धा आपल्या लैंगिक अवयवांसंबंधी, एकूणच लैंगिकतेसंबंधी व्यवस्थित माहिती नसते. कारण त्यांनासुद्धा कुणी याविषयी कधी शास्त्रशुद्ध पद्धतीने सांगितलेले नसते. अगदी शाळा कॉलेजमध्येसुद्धा लैंगिकता शिक्षण किंवा लैंगिक अवयव याविषयीची प्रकरणे टाळली जातात. त्यामुळे पालकांसोबतच शिक्षकांचेसुद्धा प्रशिक्षण व्हायला हवे.

लैंगिकता शिक्षणामध्ये मुलांच्या वयोगटानुसार त्यांना काय माहिती द्यायची हे जास्त महत्त्वाचे आहे. यामध्ये वर सांगितल्याप्रमाणे आधी लैंगिक अवयवांविषयीची नकारात्मक भावना, प्रतिक्रिया मुला-मुलींमध्ये पोहोचणार नाहीत याची दक्षता घेणे हे मूलभूत आहे. त्यानंतर प्रत्यक्ष संवादाच्या पातळीवर अगदी तीन वर्षांच्या मुलांपासून या संवादाची सुरुवात आपण करू शकतो. या वयात त्यांना शरीराच्या इतर अवयवांसोबतच तितक्याच मोकळेपणाने, मनात कोणताही संकोच न आणता लैंगिक अवयव, त्यांची शास्त्रशुद्ध नावे व त्यांचे शरीरातील कार्य याविषयीसुद्धा सांगायला हवे. यासाठी अनेकदा चित्रांचा वापर केला जातो. त्यामध्ये पूर्ण शरीर दिसेल अशा चित्रांचा वापर करावा. लैंगिक अवयव झाकून ठेवलेली चित्रे वापरू नयेत. याचवेळी लैंगिक अवयवांच्या खाजगीपणाविषयीसुद्धा मुलांना सांगावे. गुड टच, बॅड टच याविषयी माहिती द्यावी.

या वयात मुलांच्या मनात अनेक प्रश्न येतील. ज्यात लैंगिक अवयवांसोबतच मी या जगात कसा आलो? आईच्या पोटात कसा/कशी गेलो/गेले? यांसारखे मूलभूत प्रश्नसुद्धा असतात. या सर्व प्रश्नांची उत्तरे पालक म्हणून आपण मुलांना समजेल अशा भाषेत देत राहायला हवीत. यात अतिशय महत्त्वाचे म्हणजे मुलांच्या मनातील कोणत्याही प्रश्नाला चुकीचे न समजता किंवा त्यावरून त्यांना ओरडून गप्प न बसवता त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला जमेल तसे,

**(पृष्ठ क्रमांक २६ वर)**

प्रासंगिक

# पर्यावरणीय समस्या : जबाबदार मानव की विज्ञान?



**विनोद दळवी** । पिंपरी-चिंचवड
९८२२१२०५९४

सूर्यमालेतील सर्व ज्ञात ग्रहांपैकी फक्त पृथ्वी हाच ग्रह जीवसृष्टीस आधार देतो. कारण ती सूर्यापासून योग्य अंतरावर आहे. हानिकारक सौर किरणोत्सर्गापासून ती तिच्या चुंबकीय क्षेत्राद्वारे संरक्षित झालेली आहे. तिच्या भोवतीचे उष्णतारोधक वातावरण तिला सूर्याच्या उष्णतेने अधिक तप्त होऊ न देता जीवसृष्टीला आवश्यक इतपतच उबदार ठेवते. पृथ्वीवर जीवसृष्टीच्या निर्मितीसाठीचे पाणी आणि कार्बनसह जीवनावश्यक असे रासायनिक घटक आहेत. पण जे पृथ्वीवरील सर्व जीवनच संपवू शकतील असे घातक बदल अलीकडे ह्याच पृथ्वीच्या पर्यावरणात घडत आहेत.

पर्यावरणाच्या संरक्षणाविषयी जागरूकता निर्माण करून तशी कृती करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी १९७२ पासून दरवर्षी ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याचे ठरविले. भारतासह १४३हून अधिक देशांचा जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात सहभाग असतो. स्थापनेच्या एक वर्षानंतर, १९७३ मध्ये 'फक्त एकच पृथ्वी' या थीमसह पहिला जागतिक पर्यावरण दिन आयोजित करण्यात आला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विशेषतः सागरी प्रदूषण, लोकसंख्यावाढ, जागतिक तापमानवाढ, शाश्वत उपभोग, वन्यसृष्टीचा ऱ्हास आणि वन्यजीवसंबंधी गुन्हेगारी यांसारख्या पर्यावरणीय समस्यांबाबत जागरूकता निर्माण केली जाते.

ह्या सर्व समस्या जागतिक असल्यामुळे एका देशाच्या बाबतीत निर्माण झालेली समस्या इतर देशांवरसुद्धा परिणाम करते. त्यामुळे सर्व देश मिळून सर्वसाधारण समस्यांवर उपाययोजना करतात. ह्या समस्यांव्यतिरिक्त प्रत्येक देशाच्या विशिष्ट पर्यावरणविषयक समस्या असतात. जसे की, वायू प्रदूषण, जल प्रदूषण, भूमी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण इत्यादी, ज्यावर त्या त्या देशांनी उपाय करणे अपेक्षित असते.

भारताची पर्यावरणीय समस्यांबद्दलची परिस्थिती खूपच चिंताजनक आहे. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. Energy Policy Institute at University of Chicago या शिकागो विद्यापीठाअंतर्गत संस्थेने प्रकाशित केलेल्या सन २०२३ च्या जागतिक वायू गुणवत्ता अहवालात Air Quality Life Index (AQLI) म्हणजे वायू प्रदूषणामुळे मानवी आयुष्यावर होणारा परिणाम दर्शवणारा निर्देशांक प्रसिद्ध झालेला आहे. त्यानुसार भारत जगातील तिसरा सर्वात प्रदूषित देश आहे. दिल्ली हे जगातील सर्वात अधिक प्रदूषित राजधानीचे शहर ठरले आहे. QLI नुसार वायू प्रदूषणामुळे दिल्लीतील रहिवाश्यांचे आयुष्य ११.९ वर्षांनी घटण्याचा परिणाम होतो आहे. तसेच ध्वनी, जल आणि भूमी प्रदूषण भारतात खूपच जास्त प्रमाणात होते आहे. जो देश चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर अवकाशयान यशस्वीपणे उतरवणारा पहिला देश असा मान पटकावतो त्या देशाला ह्या पर्यावरणीय समस्या का सोडवता येऊ नयेत?

ह्याचे मुख्य कारण म्हणजे भारतात पर्यावरण आणि पर्यावरणीय समस्यांबद्दल असलेली उदासीनता. तसेच ह्या समस्या मानवनिर्मित न समजता त्या मानवाच्या आधुनिक प्रगतीने आणि विज्ञानाने निर्माण केल्या आहेत असा आरोप करणे. त्यामुळे त्या अटळ आहेत अशा समजुतीने त्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत उदासीनता दिसून येते. खरंच ह्या समस्या विज्ञानाने आणि त्यामुळे झालेल्या आधुनिक प्रगतीने निर्माण केल्या आहेत का?

विज्ञान हे निसर्गात ढवळाढवळ करणारेच असते आणि त्यामुळे ते विनाशकारीच असते असा एक सामान्य गैरसमज निर्माण झालेला आहे. खरेतर तो गैरसमज केवळ अज्ञानातून आणि शासन, प्रशासन, भांडवलदार व धर्माच्या दलालांकडून त्यांचा स्वार्थ जोपासण्यासाठी पसरवला जातो. विज्ञानाविषयीचे असे गैरसमज आपण विज्ञान आणि त्याविषयीच्या संकल्पना समजून घेऊन तो दूर करू शकतो. त्यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञान हे मानवासाठी किंवा निसर्गासाठी कल्याणकारी अथवा

विनाशकारी ठरतात. ते मानव त्याचा वापर कसा करतो यावरून ठरते. त्यामुळे विज्ञान हे पर्यावरणाचा ऱ्हास करणारेच असते हा केवळ गैरसमज आहे.

विज्ञान हे मूलभूत संशोधन करते तर तंत्रज्ञान हे त्या मूलभूत संशोधनाचा व्यवहारात वापर करून मानवाला उपयोगी अशा वस्तूंचे उत्पादन, निर्मिती करते. त्यातूनच विविध आरोग्य, दळणवळण अशा अनेक सेवांची निर्मिती होते. उत्पादनांच्या अशा निर्मिती प्रक्रियेमध्ये काही टाकाऊ पदार्थ निर्माण होतात. उत्पादने वापरून त्यांचा कचरा निर्माण होतो. या टाकाऊ पदार्थांची आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावता येते. त्यासाठी सुद्धा विज्ञानच उपयोगात येते. परंतु त्या टाकाऊ पदार्थांची आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नाही. साधारणतः जैविक तसेच सेंद्रिय पदार्थ नैसर्गिकरीत्या विघटन पावतात आणि त्यांचे रूपांतर निसर्गातीलच घटकांमध्ये होते व निसर्गचक्र पूर्ण होते. परंतु अनेकदा मानवनिर्मित वस्तूंच्या प्रक्रियेतील टाकाऊ पदार्थ आणि त्या वस्तू वापरून निर्माण झालेला कचरा हे जैविक किंवा सेंद्रिय नसतात. त्यांचे विघटन सेंद्रिय पदार्थांच्या सारखे लवकर आणि नैसर्गिक प्रक्रियेनुसार होत नाही. त्यांचे विघटन होण्यास दीर्घकाळ लागतो. त्यातील काही जीवसृष्टीला थेट हानिकारक असतात. त्यामुळे अशा टाकाऊ पदार्थांचे आणि कचऱ्याचे पुढील विघटन करूनच विल्हेवाट लावली पाहिजे. जर आपण विज्ञानाचा आणि तंत्रज्ञानाचा वापर आपल्या मानवी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी करणार असू तर त्यातून निर्माण झालेल्या अशा समस्यांवर उपाययोजन करणे हे सुद्धा आपले कर्तव्यच ठरते. हे कर्तव्य आपण पार पाडत नाही. म्हणून पर्यावरण ऱ्हासाच्या समस्या निर्माण होतात.

१९५१ साली जगाची लोकसंख्या २५४ कोटी, तसेच जगाचे सरासरी आयुर्मान ४५ वर्षे होते आणि भारताची लोकसंख्या ३६ कोटी; तसेच भारताचे सरासरी आयुर्मान ३५ वर्षे होते. आज २०२४ मध्ये जगाची लोकसंख्या ८०० कोटी तसेच जगाचे सरासरी आयुर्मान ७३ वर्षे झाले आहे आणि भारताची लोकसंख्या १४१ कोटी तसेच भारताचे सरासरी आयुर्मान ७० वर्षे झाले आहे. आजच्या मानवाच्या जीवनाची गुणवत्ता हजारो वर्षांपूर्वीच्या मानवापेक्षा निश्चितपणे वाढली आहे आणि त्याला कारण विज्ञान व तंत्रज्ञान हेच आहे.

परंतु ह्या वाढलेल्या लोकसंख्येचा पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनावर आणि पर्यावरणावर विपरीत ताण पडत आहे. जगाची लोकसंख्या १.६० टक्के दराने तर भारताची लोकसंख्या १.९५ टक्के अशा वार्षिक चक्रवाढ दराने वाढत आहे. ह्या दराने जगाची लोकसंख्या पुढील १०० वर्षात ३९१२ कोटी तर भारताची लोकसंख्या ९७२ कोटी होईल. यामुळे नैसर्गिक संसाधनावर आणि पर्यावरणावर विपरीत ताण इतका वाढेल की, ही नैसर्गिक व्यवस्था कोलमडून पडेल. मृत्यूदरात घट, वाढलेले आयुर्मान आणि प्रजनन दरात झालेली वाढ यामुळे जगाची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. हे सर्व बदल मानवाने विज्ञानातून, मिळालेल्या ज्ञानातून आणि त्याचा वापर करून तयार केलेल्या तंत्रज्ञानातून घडवून आणले; पण ह्यामुळे लोकसंख्या वाढीस विज्ञान जबाबदार आहे का? नाही. कारण विज्ञानाने फक्त लोकसंख्यावाढीस पूरक असे ज्ञान दिलेले नाही, तर ती आटोक्यात ठेवण्याचे आणि तिचे नैसर्गिक संसाधनांवर होणारे विपरीत परिणाम टाळण्याचेसुद्धा ज्ञान दिले. पण अगोदर सांगितल्याप्रमाणे मानवाने आणि त्यांच्या विशिष्ट समूहाने स्वतःच्या स्वार्थासाठी ह्या दुसऱ्या ज्ञानाचा प्रचार व वापर होऊ दिला नाही किंवा शक्य तितका टाळला. आधुनिक वैद्यकीय विज्ञान मानवाचे आयुर्मान व प्रजनन दर वाढवण्यास आणि मृत्युदर घटवण्यास मदत करते. तसेच गर्भनिरोधकासारखे प्रजनन रोखण्यास उपयोगी अशी साधने उपलब्ध करून देते. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपण नापीक जमीनसुद्धा सुपीक करू शकतो, पिण्यायोग्य पाण्याचा साठा वाढवू शकतो, आवश्यक अशा खाद्यपदार्थांचे उत्पादन वाढवू शकतो, ज्यामुळे लोकसंख्येचा नैसर्गिक संसाधनावरचा ताण कमी होईल.

स्त्री-पुरुष समानता मानून आणि गर्भनिरोधक वापरून जर प्रत्येकाने एकाच मुलाला जन्म दिला, तर ही जागतिक लोकसंख्यावाढीची समस्या आपण टाळू शकतो. त्यासाठी स्त्री-पुरुष समानता आणि गर्भनिरोधकांचा वापर ह्याबद्दल शासनाने प्रबोधन केले पाहिजे; तसेच ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक त्या सामाजिक सुविधा दिल्या पाहिजेत.

सागरी प्रदूषणाचा सर्वात मोठा योगदानकर्ता हा प्लास्टिक कचरा आहे. दरवर्षी १ कोटी टनापेक्षा जास्त प्लास्टिक कचरा समुद्रात प्रवेश करतो. पृष्ठभागावरील

पाण्यापासून खोल समुद्रातील गाळांपर्यंत एकूण सागरी मैल्यापैकी ८०% मैला बनण्यास प्लास्टिक कारणीभूत आहे. त्यामुळे समुद्रातील पर्यावरणाची हानी होते. प्लास्टिक कचऱ्याचे विघटन होण्यास शेकडो वर्षे लागू शकतात. ह्या सर्व कारणांमुळे प्लास्टिक कचरा आणि सागरी प्रदूषण ही जागतिक समस्या निर्माण झाली आहे. आपण लाकूड, काच, कापड अशा प्लास्टिकला पर्यायी वस्तूंचा वापर करून तसेच प्लास्टिकचा पुनर्वापर करून प्लास्टिक प्रदूषण कमी करू शकतो.

प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि खराब कचरा ही भारतातील जल आणि भूमी प्रदूषणाची सर्वात मोठी कारणे आहेत. यामध्ये घरातील आणि उद्योगांमधील कचरा व सांडपाण्याचा समावेश आहे. ह्या कचऱ्यावर व सांडपाण्यावर सरकार आणि उद्योगांनी प्रक्रिया केली तर ही समस्या सुटू शकते. आज जगामध्ये अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जपान, सिंगापूर असे कितीतरी देश आहेत. ज्यांनी भूमी आणि जलप्रदूषणावर मात केली आहे. ह्या देशांमधील नळाचे पाणीसुद्धा पिण्यायोग्य असते. लंडनमधील टेम्स नदी जगातील सर्वात स्वच्छ नद्यांपैकी एक मानली जाते. पण हे जाणून तुम्हाला आश्चर्य वाटेल की, ही नदी लंडनच्या नॅचरल हिस्ट्री म्युझियममधील शास्त्रज्ञांनी जैविकदृष्ट्या मृत घोषित केल्यानंतर विज्ञानाचा वापर करून अवघ्या ६० वर्षांनी या नदीचे प्रदूषण कमी केल्यावर पुन्हा नैसर्गिक स्थितीला पोहोचली.

दिल्लीतील वायू प्रदूषणाचे सर्वात मोठे कारण म्हणजे जीवाश्म इंधनाचा ऊर्जानिर्मितीसाठी वापर आणि उद्योगातून होणारे प्रदूषण आहे. बहुतेक ऊर्जा अजूनही कोळसा, तेल किंवा वायू ह्यासारखे जीवाश्म इंधने जाळून तयार केली जाते, ज्यामुळे कार्बन डायऑक्साईड आणि नायट्रस ऑक्साईड तयार होतात. हे वायू पृथ्वीला आच्छादित करतात आणि सूर्याची उष्णता अडवतात त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. ह्यामुळे जागतिक तापमानवाढ होऊन हवामानात बदल घडतो, जे पृथ्वीवरील सजीवांस अनुकूल अशा वातावरणाचा विनाश करतात. जीवाश्म इंधनाऐवजी सौर, पवन किंवा भू-औष्णिक ऊर्जा वापरून तसेच वृक्षांची लागवड करून पर्यावरणास पूरक असे उपाय करून आपण वायू प्रदूषण टाळू शकतो.

अमेरिका, कॅनडा आणि इतर विकसित देश औद्योगिक व तंत्रज्ञानाविषयी खूप प्रगती साधूनसुद्धा पर्यावरणीय समस्यांवर मात करू शकले ह्याचे कारण म्हणजे त्यांनी काटेकोर पर्यावरणीय कायदे तयार केले आणि त्यांची अंमलबजावणी केली, उत्सर्जन नियंत्रण तंत्रज्ञानाचा विकास केला, हरित ऊर्जा स्त्रोतांमध्ये गुंतवणूक केली, प्रगत कचरा व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब केला, पर्यावरणाविषयी शिक्षण कार्यक्रम आणि मोहिमा आखून जनजागृती केली आणि सतत पर्यावरण निरीक्षण केले. हे सर्व उपाय आपण भारतात राबवून भारताची पर्यावरणीय समस्या सोडवू शकतो. भारतात अनेक धार्मिक आणि सांस्कृतिक श्रद्धा, प्रथा, परंपरा अशा आहेत ज्यामुळे पर्यावरणाच्या प्रदूषणाला कारण ठरतात. अशा श्रद्धा, प्रथा आणि परंपरांच्या निर्मूलनासाठी प्रबोधनाची मोठी गरज आहे.

म्हणजेच विज्ञानातून मिळालेल्या ज्ञानाचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपण वरीलप्रमाणे ह्या पर्यावरणीय समस्यांवर उपाययोजना करू शकतो. पण हे उपाय आणि लोकसंख्या वाढीस अटकाव, आर्थिक प्रगती भांडवलदारांच्या फायद्याचे नाहीत. तसेच उपाययोजनांमुळे त्यांचा खर्च वाढतो व नफा कमी होतो. त्यामुळे अगोदर सांगितल्याप्रमाणे, सरकार, प्रशासन, भांडवलशहा व धर्ममार्तंडांची युती या सर्व उपाययोजनांनुसार काम करत नाहीत. याउलट, सर्वसामान्य लोकांना झाडे लावा, पाणी जपून वापरा, प्लास्टिकचा वापर टाळा, सायकल वापरा, अशा थातूरमातूर गोष्टी करण्याचा मलमपट्टीचा सल्ला देऊन वेळ मारून नेली जाते व पर्यावरणाचा आणि त्याद्वारे ह्या विश्वात आपले एकमेव असे घर असलेल्या पृथ्वीचा विनाश करण्यात ज्या मुख्य गोष्टी कारणीभूत आहेत त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

वरील विवेचनावरून लक्षात येईल की, पर्यावरणीय समस्येस विज्ञान जबाबदार नसून मानव जबाबदार आहे आणि ही समस्या सोडवण्यासाठी मानवाने विज्ञानाचा विधायक उपयोग करून घेतला पाहिजे.

●

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाचे**
**आपण आधारस्तंभ आहात! समिती आपली ऋणी आहे!**

**अनघा पाटील, शहादा**
**डॉ. अजहर पठाण, शहादा**
**इसूफभाई हमजाभाई प्रकाशावाले, शहादा**

# विवेकी विचारांचे बीज पेरावे तरी कसे?



**चंद्रसेन टिळेकर** । मुंबई
९९६७७९५८३८

**(गेले काही दिवस मी माध्यमांमध्ये सातत्याने बुवाबाजीचे दळण दळतोय याची मला कल्पना आहे. परंतु आपले प्रश्न आपण न सोडविता दुसऱ्या कोणावर तरी सोपवायचे ही जी प्रवृत्ती आपल्या समाजात गेल्या शतकापासून वाढीस लागली आहे. ती पुलंच्या शब्दांत सांगायचे तर सर्वसामान्यांचा बौद्धिक आळस वाढवणारी तर आहेच; पण माणुसकीलाही काळिमा फासणारी आहे. कारण बुवा, बापू, स्वामी, महाराज यांना आपले सर्वस्व अर्पण केल्याशिवाय भक्तांना चैन पडत नाही आणि या भक्त समूहात स्त्रिया अधिक संख्येने असतात हे आणखी एक कटूसत्य!)**

काही दिवसांपूर्वी सोशल मीडियात एक व्हिडीओ पाहिला. त्यामध्ये काही भक्त आपल्या 'बापू' नामक गुरूचे पाय धुऊन त्या पायाचे चक्क चुंबन घेत होते. हे माणुसकीला काळिमा आणणारे नाही काय? अर्थात, हे काही आजचे नाही. पेशवाईच्या काळातही घरी आलेल्या ब्राह्मणांचे पाय धुऊन ते पाणी तीर्थ म्हणून बहुजन मंडळी ते भक्तिभावाने पिऊन टाकीत. खरे तर, केवढी देदीप्यमान अशी संतपरंपरा आपल्या महाराष्ट्राला लाभली आहे. कुणाही संताने माणूसपणाची विटंबना व्हावी अशी पायधुणी भक्ती महाराष्ट्राला शिकवलेली नाही. पण आम्ही त्यांच्यापासून काही शिकलो का? याबद्दल शंका येते. अन्यथा, जो एक 'बापू' आज खून व बलात्काराच्या गुन्ह्याखाली तुरुंगात आहे. त्याच्या नावाने दरवर्षी आम्ही दिंडी काढून ती पंढरपूरला नेली नसती. तसेच आमच्या एका माजी मुख्यमंत्र्यांनी सत्यसाईबाबाला सरकारी बंगल्यावर बोलावून त्याचे पाय धुतले नसते आणि ते पाणी सर्व बंगल्यावर शिंपडले नसते. तसेच दुसरे एक माजी मुख्यमंत्री जाहीरपणे मुक्ताफळे उधळतात की, राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता श्रेष्ठ असते. त्यांना अर्थातच युरोपीय रेनेसान्सची माहिती नसावी की, जिथे धर्मसत्ता उखडून टाकली गेल्यामुळेच वैज्ञानिक क्रांती झाली आणि त्या जोरावर युरोपातल्या छोट्या-मोठ्या देशांनी जगभर राज्य केले. टीचभर इंग्लंडने आमच्या खंडप्राय अशा हिंदुस्थान देशावर दीडशे वर्षे राज्य केले, हेही विसरता येणार नाही. (पण आमच्याकडे मात्र पाठ्यपुस्तकात धर्मग्रंथांची शिकवण समाविष्ट करून आम्ही गंगा उलटी कशी वाहील या प्रयत्नात आहोत.)

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर धर्माच्या आडोशाने हे ढोंगी, बाबा, बुवा, बापू भाबड्या जनांची पूर्वी फसवणूक करायचे त्याला 'अंधश्रद्धा निर्मूलन समितीने' महत्प्रयासाने जो 'अघोरी प्रथा व जादूटोणाविरोधी' कायदा महाराष्ट्रात करून घेतला. त्यामुळे त्याला चांगलाच चाप बसला आहे. देशभर हा कायदा व्हावा म्हणून ही समिती प्रयत्नशील आहे. भोलेबाबाच्या या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हावी, भोलेबाबावर मनुष्यवधाचा खटला भरावा, अशीही मागणी या समितीने केली आहे.

निर्बुद्ध भक्तीचे जे थैमान आपल्या देशात सुरू झाले आहे. त्यावर काही मंडळी उपाय सुचवतात तो म्हणजे निरीश्वरवादाची कास धरण्याचा. कदाचित या साऱ्याचा उबग आल्यानेच डॉ. श्रीराम लागूंसारखी मंडळी 'परमेश्वराला रिटायर' करण्याचा उपाय सुचवित असावीत. तो अर्थातच फारसा चुकीचा आहे असेही नाही. कारण पृथ्वीतलावरील काही राष्ट्रांतील जनता जेव्हापासून संख्येने अधिकतर निरीश्वरवादी म्हणजेच नास्तिक झाली तेव्हापासून त्या राष्ट्रांचा विकास झपाट्याने झाल्याचा यासंदर्भात जे अहवाल प्रसिद्ध होतात त्यावरून आपल्या लक्षात येते. परंतु आम्हा भारतीयांचा मोठा असा ग्रह आहे की, 'विज्ञानात जरी आम्ही मागासलेले असलो तरी अध्यात्मात पुढारलेले आहोत आणि सर्व जग आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी आमच्याकडे आशेने पाहात आहे.' आता हे सत्य आहे की, स्वप्नरंजनाच्या डोही डुंबविणारी अंधश्रद्धा याचे उत्तर ज्याचे त्याने आपल्या विवेकवादाच्या आधारेच शोधावे हे उत्तम!

त्याचे उत्तर काहीही असले तरी आपण सगळ्यांनी मनाशी एक खूणगाठ नक्कीच बांधली पाहिजे आणि ती

म्हणजे आपले प्रश्न आपणच सोडवायचे असतात. दुसरी कुठलीही पारलौकिक, अलौकिक दैवी शक्ती सोडवू शकणार तर नाहीच, पण होऊन गेलेले आणि इहलोकी ठाण मांडून बसलेले बाबा, बुवा, स्वामी हे तर नाहीच नाही. आता हे मीच काय कोणीही कितीही पोटतिडकीने सांगितले तरी हे पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यासारखे आहे असे वाटू लागले आहे. याचे कारण म्हणजे पुरोगामी समजल्या जाणाऱ्या या महाराष्ट्रात आमच्या नावाजलेल्या मराठी कलावंतांनी गेल्या काही दिवसांपासून आपापल्या महाराजाने, बुवाने, स्वामीने आपल्याला संकटातून कसे वाचवले याच्या कहाण्या निरनिराळ्या वाहिन्यांवरून सांगायला सुरुवात केली आहे. रोज कोणी ना कोणी नामवंत कलावंत कुठल्या ना कुठल्या चॅनेलवरून चमत्काराचा हा रतीब घालीत असतो. या कलावंतांवर जनता मोठ्या संख्येने प्रेम करीत असल्याने मोठे अविचारी वादळ घोंगावू लागले आहे. अशा वादळी परिस्थितीत विवेकी विचारांचे बीज या फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रभूमीत पेरायचे तरी कसे? असा यक्षप्रश्न निर्माण झाला आहे.

**(दै. सामनाच्या सौजन्याने)**

●

---

**(पृष्ठ क्रमांक १० वरून)**

नशिबाच्या जोडीलाच समाजातील श्रद्धा, अंधश्रद्धा यांना घरात असलेल्या टी.व्ही.वरील मालिका खतपाणी घालत असतात. या नशिबाची व्याप्ती हरघडी अनुभवाला येते. आजकाल काही ठरावीक संख्येच्या व्यक्तींचा गट बनवून ठरावीक रकमेची, वस्तूंची भिशी चालवतात. उदा. दहा सभासदांच्या नावाच्या दहा चिठ्ठ्या टाकून त्यातील एक चिठ्ठी काढली जाते. चिठ्ठीवर ज्याचे नाव असेल त्याला त्या महिन्याची भिशी दिली जाते. त्या महिन्यात, त्या वेळी त्या व्यक्तीचे नशीब होते म्हणून त्याला भिशी मिळाली, अशी सर्वांची समजूत असते. भिशी मिळणे यात खरोखर नशीब असेल का? भिशीसाठी म्हणून ज्या चिठ्ठ्या काढल्या जातात याची त्या प्रसंगाच्या कारणासहित खबर कोणत्या तरी अदृश्य शक्तीला मिळते आणि ती त्या ठिकाणी हजर होऊन विशिष्ट चिठ्ठी काढली जावी यासाठी सर्व परिस्थितीवर नियंत्रण ठेवते असे म्हणणे हास्यास्पद होईल. तसे असेल तर त्याच कारणासाठी एकदा नाही तर हजारो वेळा जरी चिठ्ठी काढली तरी त्याच व्यक्तीच्या नावाची चिठ्ठी निघाली पाहिजे. पण तसे होत नाही. यात खरे तर कोणताही कार्यकारणभाव जसा नसतो तसा नशीब नावाचा सुद्धा घटक कार्यरत नाही. यात घटना घडण्याच्या शक्यता-अशक्यतांचे (Probability) गणित असते. त्यांचा संबंध एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील घटना आणि त्यांच्या परिणामांशी जोडण्यात कोणतीही तर्कसंगती नाही. शक्यता-अशक्यतांच्या गणिताबाबत जॉन नॅश या गणितज्ज्ञाने काही सिद्धांत मांडलेले आहेत आणि त्यासाठी त्याला नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले आहे.

जीवनात ज्या गोष्टींची कारणे खूपच गुंतागुंतीची असतात, त्यामुळे त्यांचा अर्थ स्पष्ट होत नाही, त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी नशीब ही संकल्पना असून ती प्रत्यक्ष व्यवहारात कधीही अस्तित्वात नसते. ती एक निरर्थक संकल्पना असून तिला जीवनात स्थान देऊन सतत भीतीच्या, संशयाच्या तणावात वावरण्याची गरज नाही, हे एकदा कळले की व्यक्ती अनेक प्रकारच्या तणावांतून मुक्त होते. एकदा नशीब बाद झाले की फलज्योतिष, अंकविद्या आणि व्यक्तीच्या जीवनात भीती निर्माण करणाऱ्या अशा प्रकारच्या छद्मविज्ञानांची देखील आपोआपच विल्हेवाट लागते, ते बाद होऊन आपली त्यापासून सुटका होते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१ (अ) मध्ये नागरिकांची मूलभूत कर्तव्ये जी दिली आहेत त्यातील आठवे मूलभूत कर्तव्य असे आहे - वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे. पण या कर्तव्याकडे कधी नकळत तर कधी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. अनेक प्रकारच्या अंधश्रद्धांमधून बाहेर पडण्यासाठी मनाची मोठी तयारी लागते. एखाद्या घटनेत कधी गुंतागुंतीचा असला तरी थेट कार्यकारणभाव असतो तर कधी केवळ शक्यता-अशक्यतांचे गणित असते. या बाबी समजून घेतल्या, त्यानुसार प्रयत्न केले तरच व्यक्तींमधील, समाजामधील अंधश्रद्धा क्रमाक्रमाने कमी होत जातील.

●



# आधुनिक स्त्री आणि बुवाबाजी

**अरुणा गोहणे** । गडचिरोली
९४०४१२७१७२

पूर्वी बहुजन समाजातील स्त्री-पुरुषांना शिक्षण नव्हते; संपूर्ण समाज अंधश्रद्धांचा बळी होता. ब्रिटिशांनी आधुनिक शिक्षणाच्या शाळा सुरू करून ज्ञानदानाच्या पाणपोया लावल्या आणि सर्वांना ते ज्ञान मुक्तहस्ते मिळावे यासाठी तिथे गुरुजीलाच आणून ज्ञानदान करायला बसविले. त्या काळापर्यंत ज्ञानार्जनासाठी गुरुजींच्या घरी जावे लागत होते. त्याच व्यवस्थेतून आज आपल्याकडे शिक्षण आले आहे. या शिक्षणातूनच योग्य-अयोग्य, चांगलं-वाईट यातील फरक दर्शवणारी बुद्धी विकसित होत असते. बहुजन समाजाला शिक्षण उपलब्ध नव्हते तेव्हा अनेक समाजसुधारकांनी आशा व्यक्त केली होती की, शिक्षणाचा जसजसा प्रसार होईल त्याप्रमाणात समाजातील अंधश्रद्धा कमी होत जातील. पुरुषांबरोबरीनेच स्त्रिया देखील सुशिक्षित झाल्या आहेत. पण स्त्रिया आणि अंधश्रद्धा यांचा जो अगदी जवळचा संबंध दोन शतकांपूर्वी होता तोच आजही दिसून येतो आहे; हे बघून वाईट वाटते.

महाराष्ट्र अंनिसचा देवाधर्माला विरोध नाही. पण फसव्या, स्वतःला देव म्हणवणाऱ्या भोंदू बुवा-बाबांनी देवाधर्माच्या नावाखाली जी फसवणूक चालवली आहे, जे शोषण ते करतात त्यास विरोध आहे. सुशिक्षित माणूस सुद्धा यांच्यामागे का धावतो? याच भोंदू-बाबांनी कित्येक स्त्रियांवर अन्याय केल्याच्या घटना घडत आहेत. अशा अनेक भोंदूबाबांवरील गुन्हे सिद्ध होऊन ते तुरुंगाची हवा खात आहेत. पण त्यातून आपण काहीच धडा घेत नाही. कुठल्याही सत्संगाला स्त्रियांची गर्दी सर्वाधिक बघायला मिळते आणि तेच संस्कार त्या आपल्या मुलामुलींना देत असतात. म्हणजे या स्त्रिया आपल्या पुढील पिढीची योग्य-अयोग्य विचार करण्याची, सदसद्विवेकबुद्धी बालपणातच नष्ट करीत असतात.

संत तुकाराम महाराज, संत गाडगेबाबा किंवा राष्ट्र संत तुकडोजी महाराजांनी  कीर्तनातून धर्मज्ञानाचे मर्म सांगून जे समाज प्रबोधन केले ते वास्तव जीवनात उपयोगी असे ज्ञान आहे. या संतांनी मृत्युनंतरच्या परलोकीचा धर्म न सांगता धर्म ही दैनंदिन जगण्यातून आचरणात आणण्याची बाब आहे, असे इहलोकीच्या धर्माचे महत्त्व स्पष्ट करून सांगितले. धर्माची अशी चिकित्सा करून या संतांनी धर्म समाजाभिमुख केला आणि समाजसुधारणा देखील केली. त्यांच्या मनात लोकांप्रति प्रेम, कळवळ होती. समाजासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातलं पण कधीही चमत्कार अथवा कर्मकांडे करून कोणाच्या नावे पुण्य जमा करणारा पुण्यदाता, मोक्षदाता बाबा स्वतःला म्हणवून घेत लोकांची संपती लुटली नाही; जनतेची दिशाभूल केली नाही. त्यांनी मोठमोठे आश्रम बांधून विलासी आयुष्य ते जगले नाहीत. उलट त्यांच्याजवळ असलेली स्वतःची संपत्ती लोककल्याणासाठी दान केली. संत तुकाराम महाराजांनी लोकांना दिलेली कर्जे दुष्काळात माफ करून सावकारी बंद केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आणि गाडगेबाबांनी जनतेच्या मालकीच्या अनेक शिक्षण संस्था काढून तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण व राहायची सोय करून दिली. त्यांनी आपल्या आचरणातून समाजासमोर आदर्श निर्माण केला.

या संतांना देखील वाटले होते की, शिक्षणामुळे स्त्रिया स्वतंत्र होतील. ज्या काळात अपत्यप्राप्ती दैवीकृपा मानली जायची त्या काळात देखील तुकाराम महाराजांनी सांगितले, 'नवसे कन्यापुत्र होती, तरी का करणे लागे पती'. पण आज अपत्यप्राप्तीचे विज्ञान कळून देखील भोंदूबाबांच्या फसवणुकीला स्त्रिया बळी पडतात. धर्माने निर्माण केलेल्या मानसिक गुलामगिरीची इतकी सवय झाली आहे की, ही गुलामगिरीच स्त्रियांना आपला अलंकार वाटू लागली आहे. ती मिरवण्यात मोठेपणा वाटत असेल तर कुणीतरी त्यांना आधी या गुलामगिरीचीच जाणीव करून द्यावी लागेल. आज शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध आहेत. या शिक्षणाने आपलं जीवन उत्तम घडवायचं सोडून आपण आपला वेळ वाया घालवत असू तर ही आपली जगण्याप्रति अनास्थाच म्हणावी लागेल.

संविधानाच्या माध्यमातून बाबासाहेबांनी स्त्रियांना अनेक अधिकार आणि उन्नतीच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या संधींचा पुरेपूर उपयोग करून घेता यावा यासाठी अनेक कायदे स्त्रियांच्या पाठीशी आहेत. त्यांच्या मदतीने पुढे जायचे सोडून पुन्हा मानसिक गुलामगिरी आपण का स्वीकारत आहोत? कुणाच्या चमत्कृतीपूर्ण आश्वासनांवर विश्वास ठेवण्यापेक्षा प्रत्येक गोष्ट आपण विज्ञानाच्या तर्काच्या कसोटीवर तपासून बघितली पाहिजे. त्यामागील कारणमीमांसा जाणून घेतल्यानंतर एखादी गोष्ट सत्य आढळली तर तिचा सत्य म्हणून स्वीकार करावा; मग त्यावर केवळ विश्वास ठेवायची गरजच उरत नाही.

आधुनिक शिक्षणाने ज्ञानाच्या नवनवीन शाखांची दालने उघडली आहेत. त्या विषयांची पुस्तके वाचायला, समाजप्रबोधनाच्या कार्यक्रमांसाठी आपल्याकडे वेळ नसतो; पण सत्संगाला जाण्यासाठी मुबलक वेळ असतो. मग घराकडे, मुलांकडे दुर्लक्षही होतं. अनेक कुटुंबांमध्ये घरातील काही सदस्यांना हे आवडत सुद्धा नाही. मग घरामध्ये वाद होतात, पण बाबाने वर्णन केलेल्या आभासी परलोकाच्या ओढीने मनाचा ताबा कधीच घेतलेला असतो. त्यापुढे आपल्याला दुसरा कोणताही विचार महत्त्वाचा वाटत नाही. ग्रामीण भागातच नाही तर हे प्रमाण शहरी भागात सुद्धा तेवढेच आहे. त्यामागील कारणे, राजकारण, समाजकारण अशी वेगवेगळी आहेत. पण वाईट याचं वाटतं की, शहरी भागात शिकलेल्या स्त्रियांना सुद्धा ही आभासी धार्मिकता मिरवण्यात धन्यता वाटते. आपली बुद्धी, आपले विचार ही आपली सर्वात मोठी संपत्ती आहेत. आधुनिक शिक्षणातून ते विकसित होत असतात, किंबहुना ते विकसित झाले पाहिजेत. पण अगदी उच्चशिक्षित स्त्रियांच्या बाबतीत सुद्धा असं होताना दिसत नाही. अनेक भोंदूबाबानी फसवलेल्या, अन्याय केला गेलेल्या व्यक्तींमध्ये स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.

आजकाल अध्यात्म हा एक धंदा सुद्धा झाला आहे. धंदा म्हटला की त्या धंद्यातून कमाई करण्याची कौशल्ये विकसित होतात. त्यातूनच मग ईश्वर, परमेश्वर, देवाधर्माच्या, परलोकाच्या नि पापपुण्याच्या नावावर लोकांच्या भावनांशी खेळले जाते. त्याच्या जोडीला जीवनात यशस्वी होण्यासाठी अध्यात्माचाच भाग म्हणून व्यक्तिमत्त्व विकासाचे पिल्लूही जोडले जाते. स्वतःला ईश्वर म्हणवणारे, ईश्वराचे दलाल म्हणवणारे हे भोंदूबाबा अगतिक माणसाच्या भावनांशी, दुःखाशी खेळतात आणि आपण त्यांना खेळू देतो. प्रत्येक कुटुंबात समस्या असतात आणि जवळजवळ त्या सर्व समस्यांची भारवाहक प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कुटुंबातील स्त्रीच असते. मग त्या कोणत्या न कोणत्या मार्गाने सोडविण्यासाठी स्त्रीची धडपड सुरु असते. आणि अशी स्त्री एखाद्या भोंदूबाबाच्या आश्वासनांना बळी पडते आणि त्याचाच गैरफायदा ते घेतात. असा विश्वास ठेवून वाहवत गेलेल्या अनेक स्त्रियांची उदाहरणे आपल्या आजूबाजूला घडत असतात. पण इतर स्त्रिया सोयीस्कररीत्या त्याकडे डोळेझाक करतात. याचे ताजे उदाहरण म्हणजे २ जुलैला उत्तर प्रदेशातील हाथरस येथे घडलेली दुःखद, मन सुन्न करणारी चेंगराचेंगरीची घटना. आपल्या जीवनातील समस्या हाच भोंदूबाबा सोडवेल या आशेपायी १२२ लोकांनी चेंगराचेंगरीत जीव गमावला. मृतांमध्ये स्त्रियाच अधिक आहेत.

अशा प्रकारची ही पहिलीच घटना नाही. अनेक घटना यापूर्वी घडून गेल्या आहेत. पण आपण यातून काहीच शिकत नाही ही शोकांतिका आहे. बाबा वगेरे काही 'भोले' राहिले नाहीत. सध्या आपल्या देशामध्ये बाबांचे पीक अधिक निघत आहे. आपल्या जीवनातील समस्या दूर होण्यासाठी कोणत्या भोले बाबाचे आशीर्वाद कामाला येतील यावर विश्वास ठेवणारी जनताच खरी तर 'भोली' आहे. या भोळ्या लोकांना कोण वाचवेल? त्यांच्या ठिकाणी विवेकाचा विकास झाला तरच हे लोक वाचू शकतील.

माणसामध्ये श्रद्धा असू शकते पण अंधश्रध्दा नको. श्रद्धा जगण्याला बळ देत असेल. मग ती एखाद्या व्यक्तीवर असो किंवा एखाद्या विचारावर असो. मात्र ती सुद्धा डोळस असावी. पण अंधश्रद्धा वर्तमानातील जगणंच नाकारते. जीवन जगण्यासाठी आहे. माणसांनी कधीही आपली बुद्धी गहाण ठेवू नये. अनेक शतकांनंतर खूप मोठ्या गुलामगिरीतून बाहेर पडण्याची संधी, स्वतंत्र्य आता कुठे स्त्रियांना मिळाले आहे. त्या संधी आणि स्वतंत्रता सोडून, स्वतःला समृध्द करून, जीवनाची एक उत्कृष्ट कलाकृती घडवून, मनमुराद जगायचं सोडून पुन्हा मानसिक गुलाम होण्याचे प्रयत्न आपण का करत आहोत? हा प्रश्न मला सतत सतावत राहतो.

●

# अदिवासी विकासाबाबत उदासीनता



**डॉ. दीपक मगरदे** । वर्धा
९४२१७१७१८४

अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. निरोगी जीवन जगणे प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत प्रत्येक नागरिकाला आरोग्य सुविधा मिळणे हा मूलभूत अधिकार असल्याचे नमूद आहे. मात्र गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल अतिमागास जिल्ह्याच्या क्षेत्रात या मूलभूत अधिकाराची सतत पायमल्ली होताना दिसून येते आहे. अलीकडेच अहेरी तालुक्यातील पेरमिली प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत कोरेली गावातील आर्यन अंकित तलांडे या ४ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्यामुळे या बालकाला आरोग्य सुविधा व उपचार न मिळाल्याने ही हृदयद्रावक घटना घडली. आर्यन तलांडे या चिमुकल्याची तब्येत बिघडल्यामुळे त्याच्या पालकांनी जवळच्या पेरमिली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेले असता आरोग्य केंद्रात अत्यावश्यक आरोग्य सुविधा नसल्यामुळे रुग्णाला उपजिल्हा सामान्य रुग्णालय, अहेरी, येथे घेऊन जाण्यासाठी सांगण्यात आले. पण रुग्णाला रुग्णवाहिका सेवा पुरविण्यात आली नाही. यावेळी भामरागडहून नागपूरला जाण्यासाठी निघालेल्या एस. टी. बसला वाटेत थांबवून त्या बसने आर्यनचे गरीब पालक उपचारासाठी बाळाला घेऊन अहेरीला निघाले. आईच्या कुशीत चादरीत गुंडाळलेल्या आर्यनची स्थिती खूपच वाईट झाली होती. तो हालचालही करत नव्हता. तलांडे दाम्पत्य गरीब आणि भिडस्त असल्यामुळे मदत मागायलाही संकोच करीत होते. वाटेत आर्यनची तब्येत तापाने अत्यवस्थ झाली. हे बस वाहकाच्या लक्षात आल्यावर त्याने बस चालकाशी चर्चा करून बस परत आलापल्लीकडे वळवली. एक तासाच्या प्रवासानंतर बस आलापल्लीच्या रुग्णालयात दाखल झाली. पण एस. टी. कर्मचाऱ्यांनी दाखवलेली माणुसकी निष्प्रभ ठरली. दोन तासांपूर्वीच हा चिमुकला जग सोडून गेला असे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेने संपूर्ण समाजमन हळहळले. या घटनेवरून पुन्हा एकदा गडचिरोली जिल्हा आदिवासीबहुल क्षेत्रातील आरोग्यसेवेचे विदारक चित्र समोर आले आहे.

**अंधश्रद्धेचे भयाण वास्तव**

या घडलेल्या घटनेला आरोग्य यंत्रणेची अक्षम्य चूक तर कारण आहेच; पण आदिवासींमध्ये असणारी अंधश्रद्धाही तितकीच कारणीभूत आहे. आजही आदिवासी समुदायात कमालीच्या अंधश्रद्धा बघावयास मिळतात. आर्यनची तब्येत ठीक नाही हे पालकांना माहीत असतानासुद्धा ते उपचारासाठी दवाखाना, रुग्णालय, आरोग्यकेंद्रात न जाता बाबा, भगत, वैदू, मांत्रिक, तांत्रिक, तोडगे हेच करत राहिले. त्यामुळे चिमुकल्याची प्रकृती आणखीच ढासळत गेली. परिणामी, तो बाळ योग्य वैद्यकीय उपचार वेळेवर न मिळाल्याने गतप्राण झाला. आदिवासी लोक उपचारासाठी उपजिल्हा सामान्य रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, आरोग्यकेंद्रात येत नाहीत आणि अशा स्थितीचा कर्तव्यावर असणारे आरोग्य अधिकारी गैरफायदा घेत स्वतःच्या खाजगी दवाखान्याकडे जास्त लक्ष देत असतात.

गडचिरोली जिल्हा हा आदिवासीबहुल क्षेत्र असून जिल्ह्यातील अतिदुर्गम मागास भागात अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात फोफावल्या आहेत. या क्षेत्रात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. हे क्षेत्र नक्षल प्रभावित असल्याने दळणवळणाच्या साधनांची कमतरता, खराब रस्ते व पूल इत्यादी बाबींमुळे हा भाग विकासापासून वंचित राहिला आहे. अशा परिस्थितीत घरातील कोणी व्यक्ती आजारी पडल्यास ते डॉक्टरांकडे न जाता बाबा, भगत, वैदू, तांत्रिक, मांत्रिकांकडे जाण्याकडेच त्यांचा जास्त कल असतो. शासनाने अंधश्रद्धा निर्मूलनविषयक कायदा केलेला असला तरी अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत लोकप्रबोधन, लोकशिक्षण करावे यासाठी शासन किंवा प्रशासन स्तरावरून काही प्रयत्न होत असल्याचे दिसून येत नाही. अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांची याबाबत मदत होऊ शकते. परंतु

शासन आणि प्रशासन या संस्थांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या कार्यास मदत करण्याबाबत उदासीन आहे. मागील ५० वर्षांच्या कालखंडात आजही परिस्थिती जैसे थे दिसून येते. शासन, प्रशासनाची उदासीनता मोठ्या प्रमाणात दिसून येते. या क्षेत्रात रुजू होणारे शासकीय अधिकारी व कर्मचारी हे केवळ शिक्षा भोगण्यासाठी आले आहेत अशा मानसिकतेत असतात. या क्षेत्रातील लोकांच्या समस्या, गरजा, प्रश्न यांच्याशी त्यांना काही देणेघेणे नसते. या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्था निधीअभावी प्रभावी कार्य करू शकत नाहीत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीसारख्या संस्थांनी या आदिवासीबहुल क्षेत्रात काम करण्याची नितांत गरज आहे. त्यांच्या कार्याला शासकीय स्तरावरूनही पाठबळ मिळाले पाहिजे, चालना मिळाली पाहिजे.

**सुस्त प्रशासन**

काही महिन्यांपूर्वी एटापल्ली तालुक्यातील जारावंडी आरोग्यकेंद्रात शॉर्टसर्किटमुळे आग लागली होती. जुन्या, पडक्या, जीर्ण झालेल्या आरोग्य संस्थांच्या इमारतींकडे शासन-प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत की काय अशी शंका निर्माण होते. ग्रामीण भागात विजेचा लपंडाव सतत सुरू असल्यामुळे शासकीय रुग्णालयांच्या शीतकपाटातील महागडी औषधे/ इंजेक्शन्स वैध मुदतीपूर्वीच निकामी, निष्प्रभावी होत आहेत. त्यासाठी इन्व्हर्टर किंवा सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी काही विशेष व्यवस्था व्हावी म्हणून शासन व प्रशासनाकडून कोणत्याही उपाययोजना होताना दिसून येत नाही.

**रुग्णवाहिका आहेत; पण इंधनासाठी निधी नाही**

कित्येक महिन्यांपासून रुग्णवाहिका चालकांना वेतन मिळत नाही. अशा स्थितीत काम करण्यासाठीचे त्यांचे मनोबलच नष्ट होते. खाजगी वाहन चालकांना पाचारण केले तर इतर ठिकाणी जास्त रोजगार मिळत असल्यामुळे ते आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिका व इतर वाहने चालवण्यास इच्छुक नसतात. या सर्व बाबींकडे लोकप्रतिनिधी, शासन आणि जिल्हा प्रशासन कधी गांभीर्याने लक्ष देईल की असेच सुरू राहील?

जिल्ह्यात तज्ज्ञ डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची पदे भरली नसल्यामुळे जी आरोग्य तपासणी उपकरणे उपलब्ध आहेत ती वापराअभावी धूळ खात पडली आहेत. म्हणून आरोग्यसेवा कुचकामी ठरत आहेत. ग्रामीण रुग्णालये आणि उपजिल्हा रुग्णालयांची संख्या कमी असल्यामुळे पूर्ण भार जिल्हा सामान्य रुग्णालयावर येत आहे. दुर्गम भागातून जिल्ह्याच्या ठिकाणी सामान्य रुग्णालयात पोहोचणे सर्वांनाच शक्य होत नाही. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असणाऱ्या महिला व बाल रुग्णालयाची अवस्थासुद्धा फारच बिकट आहे.

जिल्हा परिषद प्रशासनातील अधिकारी जनतेचे प्रश्न पूर्णपणे ऐकून न घेता अधिकारशाही गाजवत टोकाची भूमिका घेत असल्यामुळे जनतेमध्ये त्यांच्याविषयी रोष दिसून येतो आहे. आरोग्यसेवा आणि आरोग्य यंत्रणांची कार्यपद्धती लोकाभिमुख नाही. एकूणच आरोग्य यंत्रणेचा नुसता बोजवारा उडाला आहे. जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटना रस्त्यावर उतरून प्रशासनाला निवेदने देत प्रशासनाशी दोन हात करायला तयार आहेत. परंतु आदिवासींसारख्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी करावयाच्या संविधानिक कर्तव्यांमध्येच कसूर करणाऱ्या शासन आणि प्रशासनाला जागे करून त्यांना जाब कोण विचारणार हाच मोठा प्रश्न आहे.

**(लेखक डॉ. आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, वर्धा, येथे सहयोगी प्राध्यापक आहेत.)**

●

**वाचक प्रतिक्रिया**

ऑगस्ट २०२४ चा अंनिप अंक खूप दर्जेदार झालाय. एका दिवसात वाचून हातावेगळा करताना सकस वाचनाचा आनंद होता. सगळीच सदरे आणि त्यातील लेख आशयपूर्ण आहेत. राज्य कार्यकारिणी बैठकीत ऐकलेलं भाषण सुद्धा पुन्हा वाचताना बौद्धिक सुख होतं. आपल्याकडे लेखक जसे चांगले आहेत तसेच अंनिप टीम मधले कार्यकर्ते सुद्धा कार्यकुशल आहेत. आलेल्या लेखांवर मूळ आशयात बदल न करता, संस्कार करून त्यांचं असं काही रूप पालटलं जातं की, आपल्यालाच आपला लेख सुंदर वाटायला लागतो, हा अनुभव मी मागे घेतला होता. म्हणजे हे करू शकणारी अंनिप टीम सुद्धा जबरदस्त आहे आपली, मला असं म्हणायचंय, सगळ्यांचा खूप अभिमान वाटतो.

– **आरती नाईक**, पनवेल

# भयाची गोष्ट



**अनुज हुलके** । गडचिरोली
९८२३८८३५४१

अनेक बोधकथा प्राण्यांवर बेतलेल्या असतात. त्यातून काही प्राण्यांचे दुर्गुण, तर काहींचे सद्‌गुण चितारलेले असतात. मानवी स्वभावाशी त्याचे साधर्म्य साधून एक प्रकारे बोध केलेला असतो. नीतिमूल्य रुजवण्यासाठी अशा बोधकथा अतिशय प्रभावी ठरतात. माणसाच्या मनात भय शिरले की, माणसात विवेक राहत नाही. मती गुंग होऊन जाते. हे दाखवणारी एक बोधकथा.

एक इवलंसं गोंडस कोंबडीचं पिल्लू होतं. ते एका विशाल वृक्षाखालून जात होतं. तेव्हा त्याच्या डोक्यावर एक पान पडलं. 'आकाश कोसळत आहे' असं म्हणत ते पिल्लू पळायला लागलं. थोडे दूर गेल्यावर त्याला एक कोंबडी भेटली.

''पिल्लू, तू का पळत आहेस?'' कोंबडीने विचारले.

''आकाश कोसळत आहे, त्याचा एक तुकडा माझ्या थेट डोक्यावर पडला!'' पिल्लू घाबरत म्हणालं.

आकाश कोसळण्याच्या भीतीने घाबरून कोंबडीही पिलासह पळू लागली.

मग त्यांना दुसरा कोंबडा भेटला.

''कोंबडी, पिल्लू तुम्ही का पळत आहात?'' कोंबड्याने त्यांना विचारले.

''आकाश कोसळत आहे, त्याचा एक तुकडा पिलाच्या थेट शिरावर पडला.'' कोंबडी म्हणाली.

कोंबडाही घाबरला. त्यांच्यासमवेत पळू लागला.

नंतर त्यांना बदक भेटले. बदकाने त्यांना विचारले, ''पिल्लू, कोंबडी, कोंबडा तुम्ही सगळे का पळत आहात?''

''आभाळ पडत आहे. त्याचा एक तुकडा पिलाच्या डोक्यावर पडला!''

कोंबडा म्हणाला.

''अरे बापरे!''

एकदम ओरडून बदकदेखील त्यांच्यासोबत पळू लागले.

थोड्या वेळाने त्यांना हंस भेटला.

हंसाने पण विचारले, ''पिल्लू, कोंबडी, कोंबडा, बदक, तुम्ही का पळत आहात?''

''आकाश कोसळत आहे, त्याचा एक तुकडा पिलाच्या डोक्यावर पडला.''

हे ऐकून हंसदेखील गपगुमान त्यांच्यासवे पळू लागला.

मग त्यांना भेटला कोल्हा.

कोल्हा त्यांना विचारू लागला, ''पिल्लू, कोंबडी, कोंबडा, बदक, हंस तुम्ही सगळे का पळत आहात?''

''आकाश कोसळत आहे. त्याचा एक तुकडा कोंबडीच्या पिलाच्या डोक्यावर पडला.'' हंसाने उत्तर दिले.

कोल्हा फार धूर्त तो म्हणाला, ''काळजी करू नका. मी तुम्हाला सर्वांना सुरक्षित जागी घेऊन जाईल.''

कोल्हा त्यांना गुहेत घेऊन गेला.

''तुम्ही माझ्या गुहेत जा, आणि सुरक्षित राहा.''

सत्वर पिल्लू, कोंबडी, कोंबडा, बदक आणि हंस सगळे गुहेत शिरले.

कोल्हा दात विचकत म्हणाला, ''हे मूर्ख प्राण्यांनो! मी तुम्हा सगळ्यांना आता ताब्यात घेतलं आहे.''

' 'मदत करा!''

''मदत करा!''

पिल्लू आणि सर्व सवंगडी आकांत करू लागले.

त्यांचा आरडाओरडा कुत्र्याने ऐकला. कुत्रा गुहेकडे धावत आला.

आणि त्याने कोल्ह्याला दरडावले, ''खबरदार कोल्ह्या! मी आलो आता.''

हे ऐकताच कोल्हा काहीही न बोलता धूम ठोकत पसार झाला.

या कथेवरून हे लक्षात येईल की, अकारण अज्ञानयुक्त भीती बाळगणे कसे जीवावर बेतू शकते. एखाद्या गोष्टीची शहानिशा न करता भयभीत होण्यामुळे कोल्ह्याप्रमाणे काही लबाड लोक आपला कसा फायदा घेऊ शकतात. हा बोध या कथेतून मिळतो. आपल्या भारतीय समाजात अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा, अघोरी कृत्ये भयग्रस्त मानसिकतेचा विचार करूनच सामान्य माणसात रुजवली जातात. विशेष म्हणजे हस्तरेषा, राशिभविष्य,

ग्रहशांती, कुंडली, पापपुण्य, कर्मकांड, मंगळ, कालसर्प योग शांती इत्यादी विधी करणे. आपल्यावर काहीतरी आपत्ती येत आहे, असे कोणीतरी मन खट्टू केल्यामुळे निर्माण झालेली भीती, कुंडलीतून सांगण्यात आलेले दोष, त्यामुळे निर्माण झालेली भीती यामुळे मनुष्य भयास्तव वाटेल ते करायला तयार होतो आणि अन्यायाचा बळी ठरतो. शोषणाचा बळी ठरतो. मागे काही दिवसांपूर्वी एका घटनेत बलात्कारी 'बापू'ला अटक झाली. त्या प्रकरणातील माणसं प्रचंड भीतीने, अंधभक्तीने त्याच्या मोहजालात फसली होती. असे भयग्रस्त सामान्य लोक आपलं तन-मन-धन देण्यासही मागेपुढे पाहत नाहीत. सुरक्षिततेची भाबडी समज त्यांना तिकडे घेऊन जाते. कर्मकांडे, व्रतवैकल्ये, मूर्तिपूजा, श्रद्धा-भक्ती, व्यक्तिपूजा, एखाद्याला गुरू करून त्याचा अंकित होणे, ह्या सगळ्याच्या मुळाशी भीतीयुक्त मानसिकता असते. ही मनोदशा घालवण्याकरिता शालेय अभ्यासक्रमातून जशी बोधकथांची आवश्यकता असते, तशीच समाज प्रबोधन करणाऱ्यांचे विवेकी विचार समजून घेण्याची आवश्यकता असते. अन्यथा, ढोंगी कोल्हे लचके तोडल्याशिवाय राहत नाही.

●

## वाचक प्रतिक्रिया

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका जून २०२४ अंकातील 'कशाला करू मी वडाची पूजा' हा सुशीला मुंडे यांनी लिहिलेला लेख पुणे शहर शाखेच्या साप्ताहिक बैठकीत वाचण्यात आला. लेखावर अनेक बाजूंनी चर्चा झाली. सत्यवान सावित्रीच्या कथेमध्ये यम जेव्हा सत्यवानाला घेऊन निघालेला असतो. त्यावेळी सावित्री त्याचा पाठलाग करून, पूजाअर्चा करून त्याच्या तावडीतून सत्यवानाची सुटका करते, अशी ही साधारण कथा आहे. ही कथा काल्पनिक आहे. कथा अनेक प्रकारे आणि अर्धवट स्वरूपात सांगितली जाते, असे मनोहर पाटील यांनी सांगितले. लग्नाच्या आधी सावित्रीच्या वडिलांना नारद येऊन सांगतो की, तुमची मुलगी सावित्री हिचा विवाह सत्यवानासोबत झाल्यास वर्षभरामध्ये त्याचा मृत्यू होणार आहे, तरी देखील मुलीने निवडलेल्या सत्यवानासोबत तिचे वडील विवाह लावून देतात, हे मान्य होण्यासारखे नाही, असे विनोद लातूरकर यांनी मत नोंदविले. सावित्रीने सत्यवानाचे प्राण वाचवले, तसे मीही वडाची पूजा करून माझ्या पतीचे आयुष्यात वाढ करीन, अशी आशा आजच्याही महिलांना असते. अनेक महिलांना वटपौर्णिमेच्या व्रतातील फोलपणा लक्षात येतो. पण आपण वडाची पूजा करायला गेलो नाही आणि त्याला सात फेऱ्या मारून धागा गुंडाळला नाही, तर लोक काय म्हणतील ? याची त्यांना भीती वाटते. त्यामुळे अशा महिला देखील वड पूजेसाठी जातात. नवऱ्याच्या त्रासाला कंटाळलेल्या महिलेला देखील वडाच्या पूजेसाठी जावे लागले, असे माधुरी गायकवाड यांनी सांगितले. विशिष्ट समाजाने स्वतःचे वर्चस्व ठेवण्यासाठी अशा स्वरूपाच्या कथा गुंफलेल्या आहेत आणि त्याला बहुसंख्य समाज भुललेला आहे. चिकित्सेशिवाय कर्मकांडापासून सुटका नाही, असे मत एकनाथ पाठक यांनी व्यक्त केले. वडाची पूजा करणे हे पतिव्रतेचे लक्षण समजले जाते, असे वैशाली कळसाईत यांनी सांगितले. एका ठिकाणी पती-पत्नीने एकमेकांच्या विरोधात घटस्फोटाचा दावा दाखल केलेला आहे. मात्र ते कुटुंब, नातेवाईकांना माहीत नाही आणि ते माहीत होऊ द्यायचे नाही म्हणून त्या स्त्रीने वडपूजा केली, असे निरीक्षण निशांत धाइंजे यांनी नोंदवले. सुशिक्षित महिलांनाही वटपौर्णिमेच्या व्रतातील फोलपणा माहीत नाही. त्यामुळे तेही यात सहभागी होतात असे समाधान भगत यांनी सांगितले. आपल्या समाजात उत्सवप्रियता असल्याने लोक योग्य-अयोग्य याचा विचार न करता अनेक उपक्रम, कर्मकांड करत असतात, असे सतीश जाधव यांनी सांगितले. मी वडाची पूजा करत नाही. पती खंबीर असेल तर कुटुंबात महिलांना कर्मकांडापासून सुटका मिळते, असे पुनम जाधव यांनी सांगितले. विभक्त कुटुंबात कर्मकांड करण्यासंबंधी लवचीक वातावरण असल्याचे निरीक्षण विनोद लातूरकर यांनी नोंदवले. आपण कर्मकांड विरोधी भूमिका मांडत असताना सुरुवातीला कुटुंबामध्ये वेगवेगळी मते मांडली जातात. विरोध होण्याची शक्यताही असते, पण कालांतराने कुटुंबामध्ये परिवर्तन होते, असे निरीक्षण रतन नामपल्ले यांनी नोंदवले. अनेक ठिकाणी वडाच्या फांद्या तोडून त्या आणल्या जातात आणि त्याची पूजा केली जाते. या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होते, असे निरीक्षण स्वप्नील भोसले यांनी मांडले. अनेक कार्यकर्त्यांच्या कुटुंबामध्ये वटपौर्णिमेचे व्रत केले जात नाही. वटपौर्णिमेच्या व्रताची खिल्ली उडविणारे अनेक मिम्स प्रसारित झाले आहेत. वटपौर्णिमेच्या निमित्ताने महिलांच्या त्रासाला कंटाळलेल्या काही पुरुषांनी पिंपळाची पूजा केल्याचे समोर आले आहे, असे विशाल विमल यांनी नमूद केले. महात्मा जोतीराव फुले यांच्या वाड्याच्या आवारातील वडाला देखील महिलांनी धागे गुंडाळून वडाची पूजा केली. ज्या महात्मा फुलेंनी कर्मकांडांना विरोध करून शास्त्रीय विचार अंगीकारण्याचे सांगितले. त्याच महात्मा फुले यांच्या वाड्याच्या आवारातील वडाची पूजा करून महात्मा फुले यांचे विचार नाकारले जात आहेत, असे विशाल विमल यांनी म्हटले. यावर सगळ्यांनी चिंता व्यक्त केली. महानगरपालिकेच्या देखरेखीखाली हा वाडा आहे. त्यामुळे लोकांना कर्मकांडापासून रोखण्याची भूमिका महानगरपालिकेची आहे, असे स्वप्निल भोसले यांनी सांगितले.

– **विशाल विमल**, पुणे



# आता बोलायला शिक

**उपेंद्र रोहनकर** । गडचिरोली
९४०३२५२९४४

शिक सखे शिक, थोडं बदलायला शिक
मुकी नको राहूस, आता बोलायला शिक

बोलल्यावर लोकं तुला म्हणतील शहाणी
म्हणू देत त्यांना तशी तू नाहीच अडाणी
किती दिवस सहन करशील यांची गाऱ्हाणी
भावना तुझ्या दाबू नको मांडायला तू शिक
मुकी नको राहूस आता बोलायला शिक

चुप्पीचा फायदा तुझ्या लोकं सारे घेतात
स्वतः चुका करते अन् दोष तुला देतात
बोलणाऱ्यांची इथे सडकी वस्तूही खपते
वाहाणाऱ्या प्रवाहात उभं राहायला तू शिक
मुकी नको राहूस आता बोलायला शिक

कोवळं वय होतं सखे लग्न तुझं झालं
बाप म्हणत होता माझं ओझं हलकं झालं
तेव्हा कुठे संधी मिळाली बोलायला तुला?
जवळ आता त्यांच्या, प्रश्न करायला तू शिक
मुकी नको राहूस आता बोलायला शिक

रांधा वाढा, उष्टी काढा, जिंदगी तुझी चालली
'चूल-मूल' करता करता उताराला लागली
घरातली कामं ही का स्त्री जातीचीच झाली?
जाऊ नको मागे, उंबरा ओलांडाया शिक
मुकी नको राहूस आता बोलायला शिक

स्त्री-पुरुष समता केवळ कागदावरच आहे
व्यक्तिस्वातंत्र्याची तुझ्या घुसमट होत आहे
किती सहन करशील एक मर्यादा आहे
विषमतेची चौकट आता मोडायला तू शिक
मुकी नको राहूस आता बोलायला शिक

नशिबाच्या फेऱ्यात राहू नको अडकून
बुवाबाबांचा जमाना जाशील कधी फसून
टाकताना पाय चिखलात घे जरा समजून
विज्ञानाने केली प्रगती तर्क लावायला तू शिक
मुकी नको राहूस आता बोलायला शिक

श्रद्धेमध्ये अंधश्रद्धा ठासून भरली आहे
पाप-पुण्याच्या नावाखाली किती हत्या होत आहेत
देवाला डोक्यावर घेऊन कोणी चंदा मागतो आहे
रूढी-परंपरांना फाटा द्यायला तू शिक
मुकी नको राहूस आता बोलायला शिक

घाबरत घाबरत अशी किती दिवस जगशील?
संत, महामानव वाचत जा, सुजाण जरा होशील
परिवर्तनाच्या लढाईचा एक धागा तरी बनशील
सावित्रीचा वसा आता चालवायला तू शिक
मुकी नको राहूस आता बोलायला शिक

**(चाल : कवी इंद्रजित भालेराव यांच्या 'शिक बाबा शिक...' या कवितेवरून)**

•

**अभिवादन**





वाईतील **प्रतिथयश** डॉक्टर, लेखक - कवी, अनुवादक, वक्ते, कथाकार, विज्ञान लेखक, नाट्यकर्मी, अनेक संस्थांमध्ये कार्यरत असणारे असे उत्तुंग बहुआयामी विवेकवादी चळवळीतील व्यक्तिमत्त्व **डॉ. शंतनू अभ्यंकर** त्यांना महा. अंनिसच्या वतीने भावपूर्ण आदरांजली!

# तर, चालता हो इथून...



**सुनिता तागवान** । गडचिरोली
९७६४८८८७५९

हॅलो... देवा, तुला ऐकू येतंय का?
ऐकू येत असेल तर माझ्या प्रश्नाचे उत्तर देशील ना?
माझा हट्टच समज हवा तर..
मी भक्त आहे, तू देव
मग मी तुला विनंती तर करू शकते ना..
जर ऐकत असशील तर प्लीज
माझ्या प्रश्नाचे उत्तर दे..

मणिपुरात दोन महिलांना नग्नावस्थेत
भर रस्त्यावरून नेले
तेव्हा त्यांनी तुझ्या नावाचा धावा
नक्कीच केला असेल ना!
मग तू बचाव करण्यासाठी
धावला का नाहीस रे?
मान्य आहे रे,
त्यांनी दुसऱ्याच नावाने धावा केला असेल
पण मी तर ऐकले आहे की,
तू एकच असून तुला सगळी नावे कळतात.

पुजाऱ्याने असहाय्य मुलीवर बलात्कार केला
तिने तुझा धावा नाही केला का?
मग तू का, तिला वाचवले नाहीस?
लोक म्हणतात, देव सर्व पाहातो
मग तुला निरपराध, अबला
दिसत नाही का?
का तू अन्याय करणाऱ्याला शिक्षा देत नाहीस?
या जगात इतके दुःख का आहे?
ते तू निवारण का करीत नाहीस?

कधी कधी वाटतं.. जगात तुझं अस्तित्वच नाही..
तरी लोक का तुझ्या दर्शनाला येतात?
चेंगराचेंगरीत मरण पावतात
हाही प्रश्नच आहे....

पंढरपुरात वाघ्या-मुरळी वाहातात
कर्नाटकात देवदासींचे लग्न तुझ्याशी लावतात
मग जीवन यांचे का दुःखी?
सर्व बघूनही तू का चूप आहे?
सांग ना रे देवा......
खरंच तू, नवसाला पावतोस का?
लोकांची तुझ्यावर नितांत श्रद्धा आहे
मग दवाखान्यात का रोज इतकी गर्दी आहे?
अन्याय पीडितांना न्याय मिळत नाही..
का जातिपातीच्या नावावर इथे
अत्याचार होतात?
का जिथे तिथे बलात्कार होतात?
का इतके शोषण होते?

तू आहेस या जगात तर थांबव ना हे सर्व
करू नकोस विनाकारण गर्व
माणसाने माणुसकी कधीचीच विकली आहे.
लोकांनी एकमेकांना छळण्यात बाजी मारली आहे...
का जिकडे-तिकडे कल्लोळ माजलाय?
का इतका काळोख दाटलाय?
तुला समजत असेल तर धाव...
आणि आता तरी भरून दे सारे घाव..
तू तर सर्वात शक्तिशाली आहेस म्हणे...
मग... दीनदुबळ्यांचा बन वाली
बलात्काऱ्यांच्या छाताडावर बस
नालायकांना जमिनीत गाड.
नुसताच बघत बसणार असशील
तर, चालता हो इथून... ..
चालता हो इथून....

**(लेखिका, कवयित्री आणि सामाजिक कार्यकर्त्या आहेत)**

# महिमा वृक्षांचा



**साहेबराव गायकवाड** । नंदुरबार
८३९०१६९८८१

वृक्षाविना अक्षर नाही जगाचा
लावा हो झाडे शिवारा, शिवारा ।।

वृक्ष देती फळे, चारा, पक्षी आणि जनावरांना
अंगावरती घेती निखारा, देती छाया सकल जनांना
ऐका हो भाव मनाचा, मनाचा,
वृक्षाविना उद्धार नाही जगाचा ।।१।।

जगण्यासाठी सरपण फाटा, मोठी लाकडे इमारतीला
खाली पडला पालापाचोळा, सडूनी खत जमिनीला
सुधारे पोत भूमीचा, भूमीचा,
वृक्षाविना उद्धार नाही जगाचा ।।२।।

कर्ब वायू स्वत: शोषूनी, प्राणवायू जगास पुरवी
वातावरण स्वच्छ करूनी, निसर्गाचा समतोल राखी
सोडीतो फास जगाचा, जगाचा,
वृक्षाविना उद्धार नाही जगाचा ।।३।।

घट भरोनी मेघ चालले, वृक्ष अडविती थंड हवेने
धो - धो पाऊस खाली कोसळे, शांत होई धरणी माते
मोत्याचं पीक शिवारा, शिवारा,
वृक्षाविना उद्धार नाही जगाचा ।।४।।

बालपणाचा पाळणा लाकडी, पांगळ गाडी हाती काठी
म्हातारपणी आधार काठी, समशानीही तिरडी लाकडी
सरणाला वापर लाकडाचा लाकडाचा
वृक्षाविना उद्धार नाही जगाचा ।।५।।

संत जनाचे बोल आठवा, वृक्ष आपुला सगासोयरा
झाडे लावा, झाडे वाढवा, प्रदूषणाला आळा घाला
नाही हा बोल फुकाचा, फुकाचा
वृक्षाविना उद्धार नाही जगाचा ।।६।।

●

**(पृष्ठ क्रमांक १२ वरून)**

पण बरोबर उत्तर द्यायला हवे. अगदीच त्यावेळी काय उत्तर द्यावे हे सुचत नसेल तर 'मी याचे उत्तर नंतर देते/देतो' असं सांगून नंतर व्यवस्थित माहिती घेवून आठवणीने त्याचे उत्तर द्यावे. मुलांशी खोटे बोलू नये किंवा वेळ मारून न्यायची म्हणून काहीतरी खोटे उत्तर देवू नये. कारण यामुळे मुलांना जेव्हा हे खोटे असल्याचे लक्षात येईल तेव्हा त्यांचा तुमच्याबद्दलचा विश्वास कमी होऊ शकतो.

यापुढच्या टप्प्यावर साधारण सहा-सात ते दहा-बारा या वयोगटातील मुलामुलींसोबत त्यांच्या शरीरात पुढे होणाऱ्या हार्मोन्सच्या बदलाबाबत आणि त्यातून त्यांच्या शरीर आणि मनामध्ये होऊ शकणारी उलथापालथ याविषयी सांगायला हवे. त्यातच मासिक पाळी आणि वीर्यमुक्ती या दोन्ही अतिशय महत्त्वाच्या गोष्टी येतात. याविषयी अभ्यासपूर्ण माहिती देवून त्यांची त्यासाठी मानसिक तयारी करून घ्यायला हवी. या काळातील स्वच्छतेविषयी माहिती द्यायला हवी. मुलांच्या मनात या गोष्टींविषयी कोणताही न्यूनगंड, भीती किंवा नकारात्मक भावना येणार नाहीत याची काळजी घेऊन या काळात तुम्ही त्यांच्यासोबत आहात आणि काहीही झाले, वाटले तरी ते तुमच्याशी येऊन बोलू शकतील हा विश्वास त्यांना देणे गरजेचे आहे.

यानंतरचा टप्पा हा साधारण किशोरवयीन म्हणजेच टीनेजर्सचा, पौगंडावस्थेचा आणि त्यानंतर तारुण्याचा. या टप्प्यांमध्ये मुलांना वेगवेगळ्या लैंगिकता, लैंगिक आकर्षण, प्रेम व आकर्षण यातील फरक, प्रत्यक्ष लैंगिक संबंध, गर्भनिरोधके आणि रिलेशनशिप या सर्व मुद्द्यांवर त्यांचे मित्र-मैत्रिणी म्हणून बोलायला हवे. मुलांनी किशोरवयात पदार्पण केल्यापासून पालकांनी त्यांचे पालकत्व मित्रत्वात बदलायला सुरू करायला हवे. तरच मुलांसोबत व्यवस्थित सुसंवाद (रॅपो) ठेवता येईल व त्यांच्या या नाजूक टप्प्यात आपल्याला त्यांच्यासोबत राहून त्यांना सावरताही येईल व साथही देता येईल. ●


पुस्तक परीक्षण

# धर्मरेषा ओलांडून विवेकाकडे, मानवतेकडे...



**राजेंद्र फेगडे** । नाशिक
९०४९२८०००८

'वसुधैव कुटुम्बकम्' अशी आपल्या भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. गेल्या वर्षात पार पडलेल्या जी - २० संमेलनासाठी 'वसुधैव कुटुम्बकम्' हे उदात्त बंधुत्वाचे घोषवाक्य स्वीकारत आपण म्हटले, 'एक वसुंधरा, एक परिवार, एक भवितव्य'. अशा विधानातून आपल्या देशात जात, धर्म, लिंग, भाषा, प्रदेश अशा कोणत्याही घटकांच्या भिन्नतेमुळे भेद नाहीत, असे आपण जगाला सांगतो. परंतु आपले आजचे अंतर्गत व्यवहार खरोखरच तसे आहेत का, याविषयी आपल्याला देश म्हणून आत्मपरीक्षण करावे लागेल. जातिधर्मातील विभाजनाच्या रेषा कितीही गडद असल्या तरी त्या पुसून, ओलांडून भिन्न जातिधर्मीयांत सलोखा निर्माण करण्याचे प्रयत्न इतिहासात झालेले आहेत. धर्म, संस्कृती, कला, खानपान, रीतिरिवाज आणि अशा अनेक बाबतीतील परंपरांची देवाणघेवाण होत राहिली आणि सामाजिक सलोखा निर्माण व्हावा यादृष्टीने काही खास प्रयत्न करावे लागले नाहीत. ते मनुष्यस्वभावानुसार सहजच होत राहिले. परंतु कधी कधी विशेष प्रयत्न देखील झालेले आहेत. त्यातही प्रेम या भावनेतून भिन्नधर्मीयांमधील विवाहांच्या निमित्ताने असा सलोखा सहजरीत्या घडून आलेला आहे व आजही असेच सलोख्याचे प्रदेश निर्माण होत आहेत, ही एक आश्वासक बाब आहे. आजच्या सामाजिक विद्वेष वाढीच्या वातावरणात त्यांची दखल घेणे अत्याधिक गरजेचे आहे. हिनाकौसर खान यांनी आंतरधर्मीय विवाहितांच्या घेतलेल्या मुलाखती फेब्रुवारी २०२१ पासून 'कर्तव्य साधना' या डिजिटल पोर्टलवर क्रमाने प्रसिद्ध केल्या होत्या. या पंधरा दाम्पत्यांच्या मुलाखती आता 'धर्मरेषा ओलांडताना' या साधना प्रकाशनाच्या पुस्तकातून प्रकाशित झाल्या आहेत. भारतीय समाजात सलोखा वृद्धिंगत करण्यातील त्यांचा हा प्रयत्न कदाचित छोटासा वाटेल, परंतु आजच्या विद्वेषी अंधकारमय वातावरणात त्याचे पणतीचे महत्त्वपूर्ण काम आहे.




अलीकडच्या काही वर्षांमध्ये स्वार्थी राजकारणासाठी 'लवजिहाद' नावाचा एक विद्वेषी बागुलबुवा उभा केला गेला. या बागुलबुवाच्या आडून भिन्नधर्मीयांमध्ये भिंती निर्माण करण्याचे प्रयत्न झालेत आणि आज या प्रयत्नांनी काहीसे हिंसक रूपही धारण केलेले आहे. या बागुलबुवाला मोठे करण्यासाठी 'द केरला स्टोरी'सारख्या प्रोपगंडा सिनेमाची निर्मितीसुद्धा झाली. या सिनेमाला काही राजकीय पक्षांचे पाठबळसुद्धा मिळाले आणि हीच देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने अधिक चिंताजनक बाब आहे. याचा परिणाम भिन्नधर्मीय तरुण-तरुणींमध्ये जे प्रेमाचे बंध असतात ते तुटण्यातही झाले. प्रेम हा अगदी व्यक्तिगत व नैसर्गिक बंध असूनही तो जुळू शकणार नाही या भीतीपोटी काही प्रेमिकांनी अलीकडील काळात आत्महत्यासुद्धा केल्या आहेत. एवढे नैराश्य अशा वातावरणामुळे समाजात निर्माण झाले आहे. परंतु लवजिहाद नावाचा विद्वेषी बागुलबुवा येण्यापूर्वी गेल्या काही दशकांत अनेक आंतरधर्मीय विवाह केलेली जोडपी सुखासमाधानाने सहजीवन व्यतीत करीत आहेत. याचे दाखले हिनाकौसर यांनी या मुलाखतींच्या माध्यमातून मांडले आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण भिन्न असते. दोन व्यक्तींचे सहजीवनसुद्धा वेगळे असते. त्यामुळे या मुलाखती एकसुरी झालेल्या नसून त्यांच्या सहजीवनाचे भिन्न कंगोरे उलगडण्याचा प्रयत्न संवादक लेखिकेने केला आहे.

कोणत्याही सहजीवनात परस्परातील प्रामाणिकपणा हा सर्वात महत्त्वाचा घटक असतो. सहजीवनात प्रामाणिकपणा नसेल तर सजातीय अथवा एकधर्मीय

विवाहातसुद्धा दुभंग निर्माण होतो. प्रामाणिकपणाच्या अभावी घटस्फोटाच्या खडकावर आदळून फुटलेल्या बऱ्याच सहजीवनांच्या बोटी आपण पाहतोच. परंतु या मुलाखतींमधून परस्परांच्या धार्मिक विचारसरणीविषयी आदर, धार्मिक आचरणापासून तर व्यक्तिगत आवडीनिवडी जपण्यातून हाच प्रामाणिकपणा दिसून येतो. मुलाखत घेतलेल्या सर्व जोडप्यांमध्ये धर्माचे महत्त्व केवळ मानवतेचा संदेश देणारी एक विचारसरणी एवढेच आहे. धार्मिक कर्मकांडांच्या फोलपटात कोणीही अडकून पडल्याचे दिसत नाही. तरीही त्यांनी आपापले धर्मस्वातंत्र्य किंवा निधर्मीपणा जपलेला आहे. काहींनी आपले नास्तिकत्व जपले आहे तर काहींनी आपले आस्तिकत्वसुद्धा जपले आहे. शीख धर्मीयांत घरात देव्हारा नसतो. परंतु प्रज्ञा केळकर यांना त्यांच्या सासऱ्यांनीच देव्हारा करून घ्यावा असे सुचविले. मात्र अशी सहिष्णुता सर्वांच्याच कुटुंबीयांत दिसून येते असे नाही. स्त्रीच्या नावात पतीचे नाव हवे, टिकली लावली पाहिजे, बुरखा घातला पाहिजे अशा अनेक बाबतीत काही कुटुंबीय आग्रही असतात. तसेच मांसाहार आणि शाकाहाराबाबतसुद्धा अशीच सहिष्णुता सर्व दाम्पत्यांमध्ये आहे. अन्वर राजन यांच्या कुटुंबात अरुणा तिवारी यांच्यासाठीच म्हणून शाकाहार स्वयंपाक बनवला जातो.

सहजीवनात अत्यावश्यक असा सहिष्णुतेचा व तडजोडीचा हा पैलू या दाम्पत्यांच्या स्वभावात दिसून येतो. परंतु हा पैलू विकसित होण्यात महत्त्वाचा घटक दिसून येतो, तो म्हणजे बहुतेकांचे पुरोगामी सामाजिक संस्था व संघटनांशी त्यांचे असलेले बंध, संबंध आणि सामाजिक कार्याची जाण. या जोडप्यांमधील विशाल, सतीश, विकास हे अंधश्रद्धा निर्मूलन कार्याशी जोडले गेलेले तर निसार, अन्वर, अरुणा हे राष्ट्रसेवा दलाशी जोडलेले आहेत. विद्यार्थी संघटनांशी, 'कोरो' (कमिटी ऑफ रिसोर्स ऑर्गनायझेशन) या सामाजिक संस्थेशी आणि अशाच समाजकार्य करणाऱ्या संघटनांशी ही जोडपी तारुण्यातच जोडली गेलेली आहेत. त्यातून त्यांच्यातील प्रामाणिकपणा, सहिष्णुता, संवेदनशीलता अशा गुणांचा विकास घडून आलेला आहे. यातूनच गरिबी, शिक्षण, आरोग्य, सामाजिक समता, सामाजिक न्याय, मानवी हक्क, घरगुती आणि सामाजिक अत्याचार अशा अनेक सामाजिक समस्यांबाबत त्यांची जाणीव प्रगल्भ झालेली दिसून येते. इंदुमती-महावीर यांना विवाहाच्या आधीपासूनच केवळ गांधीविचारांचीच नाही, गांधींना नुसतं पाहिलेलीच नाहीत तर गांधीविचारांना आतपर्यंत झिरपवलेल्या माणसांचा, गांधीविचार जगलेल्या माणसांचा सहवास लाभला. गांधी कधीही सजातीय विवाहाला जायचे नाहीत; गांधींच्या या निर्धाराने महावीर यांना आयुष्यभराची प्रेरणा दिली आणि त्यांनी जातिधर्माबाहेर विवाह करण्याचा निश्चय केला. आदिवासींसाठी काम करणाऱ्या वसईतील सामाजिक कार्यकर्त्या नवलीन कुमार यांचा भूमाफियांनी खून केलेला होता. त्यातूनच पेटून उठत त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी मॅकेंझी यांनी सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले.

यातील बहुतांश जणांना आपल्या स्वतःच्या किंवा जोडीदाराच्या कुटुंबीयांकडून त्रास झालेला आहे. मात्र तरीही कोणीही त्यांच्याशी सूडबुद्धीने वागले नाही. पतीने केलेली मारझोड सहन करण्यातच पत्नीचा मोठेपणा असतो अशी समजूत असणारी मुमताज सामाजिक संघटनांच्या संपर्कात आल्यानंतर अशा अत्याचाराविरोधात काम सुरू करते. मुमताज जेव्हा त्रास देणाऱ्या नवऱ्याला सोडून एकटी राहू लागली तेव्हा स्त्रीने एकटी राहाणे पसंत नसलेली तिचीच आई तिला जाळून टाकायला निघाली होती. परंतु नंतर याच आईला मुमताजने मदत केलेली आहे. मुमताज-राहुल यांचा सुखी संसार पाहून त्यानंतर 'माझी मुलगी, माझा जावई' अशी मोठ्या अभिमानाने मुमताजची आई ओळख सांगत असते.

''आपल्या मुलांवरील संस्कारांबाबत सर्वच दाम्पत्ये जागरूक दिसून येतात. मुलांवर कोणत्याही एका धर्माचे, अतिरेकी समजुतींचे ताठर संस्कार होऊ नयेत यासाठी ते दक्ष आहेत. त्यासाठी श्रुती-इब्राहिम, अरुणा-अन्वर, समीना-प्रशांत हे आपल्या मुलांना ज्या शाळेत कोणतेही धार्मिक संस्कार होणार नाहीत अशा शाळांची निवड करतात. आम्ही तुला बिनचौकटीचं वातावरण देण्याचा प्रयत्न करतोय'', असे समीना आपल्या मुलाला सांगतात. शहनाज आपल्या मुलीला शिकवण देतात, आपली वैचारिक पातळी घसरू द्यायची नाही. आपल्या पाल्याच्या नावातून कोणता धर्म प्रतीत होणार नाही याचीही काळजी घेताना दिसतात. मुले जसजशी मोठी होत जातात तशी त्यांना आईकडच्या किंवा वडिलांकडच्या घरी कसे वागावे याचे आकलन सहजच होते. ही मुलेसुद्धा कोणत्याही धार्मिक रीतिरिवाज,

चालीरीतींबाबत फारसे आग्रही राहत नाहीत, त्यात अडकून पडत नाहीत. वर्षा-आमीन यांचा मुलगा मंदिरात जातो, टिळा लावतो, याबद्दल इतरांचा विरोध असला तरी ते मुलाला मनाई करीत नाहीत. मोठी झाल्यावर दिलशाद-संजय यांची मुलगी संजना बाहेरच्या लोकांच्या टोमण्याला उत्तर देताना म्हणते, 'जमाना बदल चुका है यार; मेरे मम्मी-पप्पा को एक-दुसरे से कोई प्रॉब्लेम नहीं तो आप लोगों को क्यों?' आंतरधर्मीय विवाहातून अशा खुल्या विचारांची, समंजस भावी नागरिकांची पिढी घडण्यास नक्कीच मदत होणार आहे.

तडजोड हा कोणत्याही सहजीवनाचा पाया असतो. वैशाली म्हणतात की, सहजीवनात भांडण आलेच; परंतु 'अंडरस्टँडिंग आणि ॲडजस्टमेंट' समजूतदारपणा, तडजोड असेल तर प्रत्येक घरात शांतता नांदू शकते. मात्र श्रुती-इब्राहिम यांच्यात नवरा-बायकोटाईप भांडणं होत नाहीत; झाली तरी ती वैचारिक आणि सामाजिक भूमिका व प्रश्नांवर होतात. या सर्व जोडप्यांच्या बाबतीत ते एकमेकांचा अवकाश जपतात ही बाब स्पष्टपणे दिसून येते. दैनंदिन कामात तडजोड करावीच लागते. आरजू-विशाल यांच्यात बाळाला न्हाऊमाखू घालणे, झोपवणे अशी संगोपनाची जबाबदारी मुख्यत्वे विशाल यांनीच उचलली आहे. समीना चपात्या करतात तर प्रशांत भाजी चांगली बनवतात. अरुणा-अन्वर यांच्या घरकामातही वाटणी नकळतच होत गेली. अरुणा यांचा नोकरीनिमित्ताने बाहेर जास्त वेळ जात असल्याने अन्वर यांनी स्वयंपाकाची जबाबदारी घेतली.

हिनाकौसर यांनी या जोडप्यांतील काहींना शेवटचा एक महत्त्वाचा प्रश्न आवर्जून विचारलेला आहे, तो म्हणजे -आंतरधर्मीय विवाहांचे आजच्या सामाजिक परिस्थितीत त्यांना काय महत्त्व वाटते? अन्वर यांना वाटते की, शिक्षण आणि नोकरी यामुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असतानाच अशा विवाहांची संख्या वाढते आहे, त्यामुळे जातव्यवस्थेने आता शेवटची घटका मोजायला प्रारंभ केला असून त्यात आपण आपल्या वाट्याचे प्रयत्न करत राहावेत. इब्राहिम म्हणतात की, आंतरधर्मीय विवाह म्हणजे भारतीय समाजातल्या विसाव्याच्या जागा आहेत. 'विसाव्याच्या जागा' या शब्दांनी खूप मोठा सामाजिक सलोख्याचा आशय त्यांनी व्यक्त केला आहे. धार्मिक श्रद्धा जपत आणि धर्मांतरे टाळून संविधानिक मूल्यांवर आधारित समाजातील सहअस्तित्व टिकविण्यासाठी असे विवाह महत्त्वाचे ठरतात; असे त्यांना वाटते. विकास शुक्ल यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व सांगत म्हटले आहे की, जातिअंत करायचा असेल तर आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह मोठ्या प्रमाणावर होणे गरजेचे आहे. बंदिस्त जातव्यवस्थेत खुल्या निवडीची शक्यता नाकारली जाते, असे विकास यांना वाटते. वर्षा म्हणतात की, समाजपरिवर्तनासाठी असे विवाह झाले पाहिजेत. लहानपणापासून वारकरी संप्रदायाचे संस्कार झालेले विशाल पुढे अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्ता होतात. ते म्हणतात की, जातीय आणि धार्मिक द्वेष हा अवास्तव आहे हे समजल्यानंतर अधिक जागृतपणे आपण समाजाकडे पाहू लागतो; बहुसंस्कृतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन विशाल होतो. वाढता जातीयवाद, लोकांनी अगदी समोरासमोर जहर ओकणे, अशा वर्तमान परिस्थितीबाबत चिंतेचा सूर व्यक्त करीत हसीना म्हणतात की, "दोन समाजात विभाजन व्हावं, राजकारण करावं असं चित्र देशात असतांना जातिजातींमधलं अंतर कमी करीत समाजाचा समतोल राखण्यासाठी आंतरधर्मीय विवाह होणं ही फार मोलाची गोष्ट वाटते." समाजात प्रेम आणि सद्भावना पेरत एकोपा निर्माण करण्याची जबाबदारी आजच्या युवा पिढीवर सोपवायची असेल तर त्यांना आधी धर्म-जातीच्या आंधळ्या संकल्पनातून बाहेर काढावे लागेल आणि ठरवून केलेले आंतरधर्मीय विवाह व्हावे लागतील, असेही मत त्यांनी व्यक्त केलेले आहे. महावीर यांनी तर याच उद्दिष्टांसाठी आंतरजातीय अथवा आंतरधर्मीय विवाह करण्याचा निश्चय केलेला होता. कट्टर आणि जातीय विळख्यातून समाजाची मुक्ती करण्यासाठी अतिशय समजंसपणे ठरवून असे विवाह व्हावेत आणि या विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा विवाहितांचे मेळावे आयोजित व्हावेत अशी सूचना महावीर करतात. धार्मिक भावनांना खतपाणी घालण्याने समाजात दुही निर्माण होत असल्याच्या या काळात संविधानाने दिलेला जोडीदार निवडीचा अधिकार तरुणांनी बजावला पाहिजे, असे मत मुमताज व्यक्त करतात. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह आता सामान्य बाब होते आहे असे मॅकेंझी यांना वाटते. या मुलाखतींमधील सर्व प्रेमविवाहच झालेले आहेत असे नाही. अरुणा-अन्वर, इंदुमती-महावीर, हसीना-राजीव यांचे विवाह हे अगदी जाणीवपूर्वक ठरवून झालेले आहेत.

प्रेमाला जातपात, धर्म, प्रांत, भाषा, हे भेद माहीत नसतात. प्रेम ही एक विशुद्ध नैसर्गिक भावना आहे. परंतु

केवळ सत्ताकारणासाठी काही लोक समाजात दुही पेरून प्रेमास जात, धर्म अशा वेगवेगळ्या साच्यात बंदिस्त करण्याचा प्रयत्न करतात; विद्वेषाचे कृत्रिम वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अर्थातच हे लोक केवळ मूठभरच असतात. जाती आणि धर्म या समाजाची कृत्रिम विभागणी करणाऱ्या व्यवस्था आहेत. विवेकापुढे त्यांचे अस्तित्व टिकत नाही. त्यांचा अंत करण्याबाबत कॉ. गोविंद पानसरे म्हणतात, जातिअंत करायचा असेल तर तुम्ही तुमच्या जातींची चिकित्सा करायला सुरुवात करा. तुमच्या जातीतली उतरंड शोधा. तुमच्या जातीने केलेले शोषण शोधा. पानसरे याच्या वक्तव्याचा विस्तार करीत पुढे म्हणता येते की, आपापल्या धर्माच्या देखील अशा चिकित्सा केल्या गेल्या पाहिजेत.

निसार अली म्हणतात, ''तुम्हाला तुमच्या धर्मात जोडीदार मिळेलही; परंतु वैचारिकता कुठून आणणार?'' राजीव गोरडे म्हणतात की, ''तुमच्याकडे विचार असेल, आचारविचारांची देवाणघेवाण असेल तर असे विवाह होणं आणि टिकणं काहीच अवघड नाही.'' थोडक्यात, प्रामाणिक विचार आणि त्यानुसार प्रामाणिक आचार हा कोणत्याही सहजीवनाचा पाया आहे. तो नसेल तर एकाच जातीतील किंवा धर्मातील विवाहही तुटतात. म्हणून जातिधर्माच्या पलीकडे जाणारा, सार आणि असार, योग्य आणि अयोग्य याची तर्कशुद्ध विभागणी करणारा विचार हाच विवेक असतो. तो विवेक समाजात वाढीस लागावा यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती प्रयत्न करते आहे. केवळ भोंदूगिरी, बुवाबाजी उघडकीस आणणे इतपतच मर्यादित न राहाता व्यापक समाजपरिवर्तनासाठी समितीतर्फे विविध उपक्रम राबविले जातात. त्यात जोडीदाराची विवेकी निवड, जातिअंतासाठी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन देऊन ते घडवून आणणे, धर्मनिरपेक्षतेसारखी संविधानिक मूल्ये समाजात रुजविणे, जातपंचायतींना मूठमाती असे अनेक उपक्रम महाराष्ट्र अंनिसकडून राबविले जातात.

तारुण्यातील प्रेम हे केवळ शारीरिक आकर्षणापुरते मर्यादित न राहाता त्याला समंजसपणाची जोड मिळावी, भावनांच्या व्यवस्थापनाचा विवेक प्राप्त व्हावा यासाठी 'जोडीदाराची विवेकी निवड' या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण शिबिरे, संवादशाळा आयोजित केल्या जातात. जातिधर्माच्या पलीकडे विचार करणारी तरुण पिढी घडावी, इतकी ती प्रगल्भ व्हावी, त्यांना समजून घेण्याइतका समाज उन्नत व्हावा यासाठी जोडीदाराची विवेकी निवड या उपक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. सत्यशोधकी पद्धतीने अथवा विशेष विवाह कायद्याअंतर्गत नोंदणी पद्धतीने आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह लावून देण्याचा एक उपक्रम राबविला जातो. त्याअंतर्गत आजपर्यंत ११०० हून अधिक विवाह लावून देण्यात आले आहेत.

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहात मुख्य अडसर असतो तो सामाजिक धारणांचा, गैरसमजुतींचा, चुकीच्या मान्यतांचा. जातपंचायती या अशा धारणांच्या, गैरसमजुतींच्या, मान्यतांच्या वाहक आणि नियंत्रक असतात. या जातपंचायतींचा प्रचंड दबाव त्या त्या समाजातील व्यक्तींवर असतो. त्यामुळे आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना या जातपंचायतींचा मोठा विरोध असतो, जाच असतो. अगदी 'ऑनर किलिंग'पर्यंत या गोष्टी वळणे घेतात. म्हणून समाजाचे प्रबोधन करीत अशा जातपंचायती बरखास्त करण्याचा उपक्रम समिती राबवते आहे. जाच करणाऱ्या जातपंचायतींवर न्यायिक कारवाई करण्यासाठी समितीच्या प्रयत्नांतूनच सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा मंजूर झालेला आहे.

व्यापक समाजपरिवर्तनाच्या दिशेने जाण्यासाठी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना महाराष्ट्र अंनिसने कायमच प्रोत्साहन दिलेले आहे. हिनाकौसर खान यांनी आंतरधर्मीय विवाहितांच्या मुलाखती घेण्याचा याच दिशेने केलेला हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. यातील प्रत्येक मुलाखतीतील व्यक्ती, त्यांची व्यक्तिमत्त्वे वेगळी आहेत. प्रत्येक सहजीवनातील ते वेगळेपण ठळकपणे प्रकट होईल अशाप्रकारे या मुलाखती घेण्यात हिनाकौसर यशस्वी झाल्या आहेत. अशा प्रकारच्या मुलाखती पुढील काळात दृकश्राव्य माध्यमातूनही प्रसारित होतील, अशी आपण अपेक्षा करू या. हिनाकौसर यांनी घेतलेल्या मुलाखती मुळातूनच वाचून त्यातील आणखीही अनेक सूक्ष्म पैलू जाणून घेण्यासारखे आहेत. सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्यात हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल.

पुस्तकाचे नाव : **धर्मरेषा ओलांडताना**
लेखक : **हिनाकौसर खान**
प्रकाशक : **साधना प्रकाशन**
पृष्ठे : २२६
किंमत : रु.३००/-

●



# लैंगिकतेचे पदर उलगडताना...

**मयूर पटारे** । पुणे
९९७०३५५१०५

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शाखांच्या माध्यमातून महाराष्ट्रभर कार्य चालते; परंतु अलीकडे महाराष्ट्राबाहेर देखील महा. अंनिसचे काही कार्यकर्ते विखुरले असून ते त्यांच्या भागात संपर्क शाखांप्रमाणे काम करीत असतात. व्यापक समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समिती वेगवेगळे उपक्रम राबवते. स्त्री-पुरुष सामानतेबरोबरच महिला आणि युवांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर काम करण्यात देखील समिती अग्रस्थानी आहे. महा. अंनिसच्या युवा सहभाग विभागाने गेल्या काही वर्षांपासून सतत कार्यरत राहून विविध उपक्रम राबवले आहेत आणि यशस्वी केले आहेत. 'युवा महोत्सव' असो किंवा युवा छावणी 'सोच' असो, हे उपक्रम म्हणजे युवकांसाठी महत्त्वाचे बौद्धिक खाद्य ठरले आहेत.

याच पार्श्वभूमीवर २० व २१ जून २०२४ रोजी राज्य युवा सहभाग विभागातर्फे 'लैंगिकतेचे पदर उघडताना' या दोन दिवसीय ऑनलाइन संवाद सत्राचे आयोजन केले होते. हा ऑनलाईन संवाद युवा विभागाच्या एका नवीन उपक्रमाची सुरुवात (नांदी) आहे असं म्हणण्यास हरकत नाही.




तर ... या दिवशी सर्व जण या संवादात ज्या निमित्ताने सहभागी झाले होते ते म्हणजे 'प्राइड मंथ'!

काय असतो हा प्राइड मंथ? आणि जून हाच प्राइड मंथ का? जून म्हटलं की आपल्या उन्हाळी सुट्ट्या संपून सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष नव्याने सुरू होते. मग केजीपासून तर शाळा, हायस्कूल, कॉलेज, पावसाळा अशा अनेक गोष्टी आठवतात. LGBTQIA+ म्हणजेच लैंगिक अल्पसंख्यांक समुदायसुद्धा शिक्षणाच्या लगबगीत असतो. पण त्यांच्या अभिमानाने जगण्याला अधोरेखित करण्यासाठी हा महिना महत्त्वपूर्ण मानला जातो. तो का व कसा याबद्दल या दोन दिवसांच्या ऑनलाईन सत्रात सविस्तरपणे संवाद झाला.

जगभरातील लैंगिक अल्पसंख्यांक समुदायाकडून जून महिना हा प्राइड मंथ म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने जगभरात विविध ठिकाणी लैंगिक अल्पसंख्यांक समुदायाच्या अभिमान पदयात्रा म्हणजेच प्राइड वॉक निघतात. समलिंगी, उभयलिंगी, द्विलिंगी व पारलिंगी (LGBTQIA) व्यक्तींच्या स्वाभिमानार्थ समर्पित असलेला जून हा महिना आहे.

या प्राइड मंथच्या निमित्ताने संवाद सत्राच्या पहिल्या दिवशी 'LGBTQIA समुदायाला समजून घेताना' या विषयावर मांडणी करण्यासाठी कोल्हापूरच्या 'अभिमान' संस्थेचे संस्थापक तसेच Gay activist विशाल पिंजानी हा उपस्थित होता. त्याचबरोबर दुसऱ्या दिवशी 'लैंगिक अल्पसंख्यांक समुदायासोबत काम करताना येणारे प्रश्न व समस्या' या विषयावर मांडणी करण्यासाठी लैंगिक अल्पसंख्यांक समुदायाच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या 'युतक चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे'चे संस्थापक अध्यक्ष व LGBTQIA+ Representative अनिल उकरंडे हा उपस्थित होता. या दोनही दिवसांच्या ऑनलाईन सत्राचे अध्यक्ष पद महा. अंनिसच्या महिला सहभाग विभागाच्या राज्यकार्यवाह आरती नाईक यांच्याकडे होते.

पहिल्या दिवशीच्या संवाद सत्राची सुरुवात पनवेल शाखेची कार्यकर्ती तेजल हिने गायलेल्या 'समतेच्या वाटेनं...' या चळवळीच्या गीतानं झाली. पुणे शहर शाखेचा युवा सहभाग विभाग कार्यवाह मयूर पटारे याने कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. वक्त्याची ओळख

शिंदखेड्याची कार्यकर्ती राधा देसलेने करून दिली. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुण्याची कार्यकर्ती साथी किरण दिवे हिने केले.

‘हम अलग है, पर गलत नही’ या वाक्याने पहिल्या दिवशीच्या सत्राचा वक्ता विशालने आपल्या संवादास सुरुवात केली. स्वतःसोबतच लैंगिक अल्पसंख्यांक समुदायातील (LGBTQIA+ Community) इतर व्यक्तींच्या आयुष्याच्या प्रवासाची गोष्टीही त्याने संक्षेपाने सांगितल्या. त्यामुळे सर्वांना या समुदायातील व्यक्तींच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या प्रश्नांचे गांभीर्य समजले. त्यानंतर त्याने लैंगिकता आणि लैंगिक कलाच्या अनुषंगाने विविध संज्ञा समजावून सांगितल्या. समाज, मित्रपरिवार व स्वकुटुंबीय या व्यक्तींना सहज स्वीकारत नसल्यामुळे त्यांची तणावपूर्ण होत जाणारी मानसिक स्थिती, अशा परिस्थितीत या समुदायातील व्यक्तींच्या मनात येणारे आत्महत्येचे विचार आणि कधी कधी आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेण्यापर्यंतचा प्रवास त्याने उलगडून सांगितला. सोबतच आपण या समुदायासोबत मैत्रीपूर्ण वर्तन ठेवल्यास आपण कुणाचा तरी जीव वाचवू शकतो ही बाबही नमूद केली. ‘‘आपल्या कौटुंबिक सणात आणि कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये या समुदायातील व्यक्तींना आमंत्रित करणे महत्त्वाचे आहे, ज्यामुळे त्यांना आपलेपणाची भावना मिळेल’’, असेही विशाल म्हणाला. त्याचबरोबर समाजाने या समुदायाशी ‘अलाय - अश्रू’ होण्याची गरज त्याने अधोरेखित केली. Ally होणे म्हणजे आपण एखाद्या विशिष्ट समुदायामधील नसतानाही त्या समुदायाच्या हक्कांसाठी जागृत राहून त्या समुदायाला त्यांचे हक्क मिळवण्यासाठी पाठिंबा देणे होय. समाजाने ट्रान्सजेंडर व्यक्तींना तृतीयपंथी न म्हणता पारलिंगी म्हणावे, ही गोष्ट देखील विशालने आपल्या या संवादातून अधोरेखित केली. कारण प्रथमपंथी कोण, द्वितीयपंथी कोण आणि तृतीयपंथी कोण, असं ठरवणारे आपण कोण? असा तर्कशुद्ध प्रश्नही त्याने यावेळी उपस्थित केला.

यानंतर समुदायातील व्यक्तींवर होणाऱ्या सक्तीच्या वैद्यकीय प्रक्रिया, त्यांच्यासाठी स्वतंत्र शौचालये नसणे, त्यांच्याबाबत शिक्षण, आरोग्य, खेळ, रोजगार व इतर सेवांमध्ये केला जाणारा भेदभाव, त्यांच्याशी होणारी हिंसा इत्यादी अशा त्यांच्या समस्यांविषयी मांडणी केली. intersex (द्विलिंगी) जन्माला आलेल्या बाळांची लहानपणीच शस्त्रक्रिया करून त्यांना कुठल्या तरी एका लिंगात आणले जाते, ज्यामुळे या बाळांचे स्वलिंग ठरवण्याचे त्यांचे व्यक्तिस्वातंत्र्य डावलले जाते; ही गोष्टही विशालने यावेळी नमूद केली. तो पुढे म्हणाला, ‘अनेकदा समलैंगिक व्यक्तींची लैंगिकता बदलण्यासाठी त्यांच्यावर कुटुंबाच्या इच्छेखातर विरुद्धलिंगी व्यक्तीकडून बलात्कार करविण्यात येतो. पण त्यामुळे त्यांची लैंगिकता बदलत नाही, कारण लैंगिकता ही चॉईस (स्वतः केलेली निवड) नसून ती नैसर्गिक असते. या संवाद सत्रातून




विशालने उपस्थित केलेल्या प्रश्नांमुळे लैंगिक अल्पसंख्यांक समुदायाविषयी समाजात असणारे अज्ञान व त्यामुळे या समुदायामधील लोकांच्या जीवनाची होणारी हेळसांड सर्वांना समजली. या सर्वांतून सामान्य जनतेसाठीसुद्धा लैंगिकता प्रबोधनाची गरज स्पष्ट होते.

लैंगिक अल्पसंख्यांक समुदायातील व्यक्ती कोणत्या लिंगभाव (जेंडर) असलेल्या व्यक्तिसमूहात राहातात, कोणती लैंगिकता (sexuality) असलेल्या व्यक्तिसमूहात राहतात यावरून त्यांचे लिंग व लैंगिकता ठरत नाही व यात बदलही होत नाही, असेही यावेळी विशालने स्पष्ट केले. या आशयघन संवाद सत्रानंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले. शेवटी ‘पाडू चला रे भिंत...’ या गीताने पहिल्या दिवसाच्या संवाद सत्राचा समारोप झाला.

दुसऱ्या दिवशी सत्राची सुरुवात घाटकोपरच्या कार्यकर्त्या निर्मला माने यांच्या ‘बेख़ौफ़ आज़ाद है जीना मुझे...’ ह्या गीताने झाली. या दिवशी संवाद साधणारा वक्ता, अनिल, याची ओळख मुंबईचा युवा कार्यकर्ता

रुपेशने करून दिली आणि नांदेडची कार्यकर्ती पूजा हिने सूत्रसंचालन केले.

संवादाच्या सुरुवातीलाच Gender ही संकल्पना समाजनिर्मित आहे, तर sex ही संकल्पना biological आहे. असे प्रतिपादन अनिलने केले. पारलिंगी व्यक्तींच्या समस्या मांडताना तो म्हणाला, ‘‘पारलिंगी व्यक्तींना शिक्षणाची आणि रोजगाराची समान संधी दिली तर ते समाजात स्वावलंबी व सन्मानाचे जीवन जगू शकतील. त्यांना निवारा मिळवण्यासाठी देवदासी, जोगतीण अशा व्यवस्थेचा आधार घेण्याची गरज भासणार नाही. या समुदायातील व्यक्तींना अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या गोष्टी मिळवण्यासाठी एवढा संघर्ष करावा लागतो की, या गोष्टीच्या अभावामुळे यातील काही लोक सेक्सवर्क किंवा भीक मागण्याकडे वळतात.’ संवादात अनिल पुढे म्हटला की, ‘समलैंगिकता हा आजार नाही आणि गुन्हाही नाही.’ त्याने लैंगिक अल्पसंख्यांक समुदायातील आरोग्याच्या समस्यांचा देखील उल्लेख केला. त्यांना एच.आय.व्ही. होऊ नये म्हणून त्यांचे प्रबोधन करण्याची आणि तो झालेल्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी काम करण्याची गरजदेखील अधोरेखित केली. समुदायातील व्यक्तिंना समजून घेऊन समाजात त्यांना सामजिक सुरक्षा (Social Security) मिळण्याची गरजही त्याने सांगितली.

संवादाच्या शेवटी अनिलने प्राईड मंथ का साजरा केला जातो, याबद्दल सांगितले. १९६९ मधील स्टोनवॉल दंगलीनंतर समलैंगिकता मुक्ती विद्रोहाच्या मालिकेनंतर एलजीबीटीक्यू म्हणजे लेस्बियन, गे, बायसेक्शुअल, ट्रान्सजेंडर आणि क्विअर अशा लोकांसाठी उघड मान्यतेचा, अस्मितेचा महिना पाळला गेला. प्राइड मंथ हा आपली अशी ओळख स्वीकारून त्याला अभिमानाने जगासमोर प्रकट करण्याचा महिना आहे; असंही तो पुढे म्हणाला. या माहितीपूर्ण संवाद सत्रानंतरही प्रश्नोत्तराचे सत्र झाले.

यानंतर संवाद सत्राची अध्यक्ष, महिला सहभाग विभागाची राज्यकार्यवाह आरती नाईक हिचे या दोनही दिवसांच्या सत्राला समर्पक असे अध्यक्षीय भाषण झाले. सत्रातील मांडणीला धरून सर्वांच्या वतीने आरतीकडून आश्वासन देण्यात आले की, इथून पुढे आपण सोबत काम करत राहू. शेवटी तेजलने दोन्ही दिवसांच्या सत्रांचा सारांश मांडत आभार मानले. या दोन्ही सत्रांमध्ये एकूण ९० ते ९५ जण सहभागी झाले होते. त्यात अनेक लैंगिक अल्पसंख्यांक समुदायातील साथी देखील उपस्थित होते. यातील काहींनी मोकळेपणाने त्यांचे अनुभव आणि मते मांडली.


या दोन्ही सत्रानंतर उपस्थितांकडून चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्यात व अशी आगळीवेगळी संवाद सत्रे नियमित होत रहावीत अशीही मागणी करण्यात आली. महा.अंनिसचा युवा विभाग वेगवेगळ्या पातळ्यांवर सतत कार्यरत असतोच, परंतु या संवाद सत्राने एक नवी ऊर्जा सर्वांना मिळली.

●











# महा. अंनिसची खबरबात



**अनिल शोभना वसंत** । पालघर
९८२३२८०३२७

**लैंगिकता प्रबोधन सप्ताह**

**कोल्हापूर :** विविध उपक्रम विभाग आणि वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग आणि महिला सहभाग विभाग महा. अंनिस जिल्हा कोल्हापूर आणि छ. शहाजी कॉलेज विवेकवाहिनी मिळून आयोजित लैंगिकता प्रबोधन सप्ताहानिमित्त एकदिवसीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) आयोजित केले होते. यामध्ये जिल्ह्यातील एकूण ४० साथी सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात छ. शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. शानेदिवान सरांच्या हस्ते झाले. शाहू कॉलेज विवेकवाहिनीचे प्रमुख शिवाजी पाटील सरांनी प्रास्ताविक केले. या प्रशिक्षण कार्यक्रमात महा. अंनिस महिला सहभाग विभाग कार्यवाह आरती नाईक यांनी 'मुलगी वयात येताना', 'प्रजनन संस्थेचे कार्य', 'प्रेमा तुझा रंग कसा' या विषयांवर तर राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती यांनी 'मुलगा वयात येताना', जोडीदाराची विवेकी निवड राज्य कार्यवाह हर्षल जाधव यांनी 'प्रेम, आकर्षण आणि हिंसा' या विषयावर मांडणी केली. शेवटी आरती आणि कृष्णात यांनी लैंगिकता प्रबोधन सत्राचे नियोजन कसे करावे आणि काही महत्त्वाच्या सूचना प्रशिक्षणार्थींना दिल्या आणि मांडणीबद्दल चर्चा घेण्यात आली. नंतर प्रशिक्षणार्थींनी आपली सत्राबद्दल मनोगते मांडली.

**पिंपरी चिंचवड (पुणे) :** शाखेमार्फत श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, चिंचवड येथे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पअंतर्गत लैंगिकता प्रबोधन अभियान राबविण्यात आले. किशोरवयीन मुलांसाठी, 'लडका सयाना होता है' आणि मुलींसाठी 'लडकी सयानी होती है', या चित्रफिती दाखवून त्यांचे प्रबोधन करण्यात आले आणि त्यांच्या पौगंडावस्थेत येणाऱ्या समस्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. लैंगिक समस्यांचे मार्गदर्शन मुलांसाठी उत्तम जोगदंड व दिगंबर कट्यारे यांनी केले. मुलींना डॉ.पुष्पा गुप्ता (त्याच शाळेच्या माजी विद्यार्थिनी) यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखेचे पदाधिकारी आणि शाळेचे शिक्षक राजकुमार माळी सर यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्या सुनिता मुखर्जी यांनी भूषविले. कार्यक्रम प्रसंगी उपप्राचार्या सुकुमारी पिल्ले, पर्यवेक्षक ब्रिजेश त्रिपाठी, पर्यवेक्षिका सरिता पांडे शालेय विज्ञान विभाग प्रमुख विरेंद्र राय, बलजीत महारू उपस्थित होते. सुमारे तीनशे विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सदर उपक्रमाचा लाभ घेतला.

**नागपूर :** लैंगिकता प्रबोधन अभियानातंर्गत 'वयात येताना' हा कार्यक्रमाचे म.न.पा. दुर्गानगर माध्यमिक शाळा, जुना सुभेदार येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात पश्चिम नागपूर शाखा कार्याध्यक्ष आसू सक्सेना यांनी महाराष्ट्र अंनिसची भूमिका व वयात येतानाची पार्श्वभूमी सांगून केली. मुली व मुले वयात येताना होणारे बदल, स्त्री प्रजननव्यवस्थेची मांडणी, प्रेम, हिंसा व आकर्षण यांवर स्लाईड शोद्वारे डॉ. कविता मते यांनी उत्कृष्ट मांडणी केली. सोबतच मासिक पाळीमध्ये उपयोगात येणारी साधने दाखवून त्याचा उपयोगदेखील सांगितला. या कार्यक्रमाला इयत्ता ७ वी ते १० वीच्या ५० विद्यार्थिनी सहभागी झाल्या. विद्यार्थिनींशी संवाद साधून त्याच्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांचे समाधान करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अंकिता हुलके (अंनिस) यांनी केले. कार्यक्रमाला दत्तात्रय नगर शाखा कार्याध्यक्ष सुधाताई बामनपल्लीवार, शाळेच्या प्राचार्या जॉर्ज व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

**बीड :** यशवंत विद्यालयातील किशोरींसमोर प्राचार्या डॉ.सविता शेटे, राज्यकार्यवाह, विवेकवाहिनी यांनी 'वयात येताना' यावर वयात येणे म्हणजे नेमकी काय प्रक्रिया होते? मुलींमध्ये होणारे शारीरिक, भावनिक बदल, त्यामागील शास्त्रीय कारणे, मासिक पाळीची संपूर्ण वैज्ञानिक माहिती आणि त्याविषयीचे अज्ञान, गैरसमज, अंधश्रद्धा, गर्भधारणा इ. यावर सविस्तर माहिती दिली. तसेच या काळात किशोरींनी घ्यायची काळजी, आहार, व्यायाम, स्वच्छता इत्यादि सखोल माहिती दिली. मासिक पाळी कोणत्याही दृष्टीने अपवित्र नसून ती पूर्णतः नैसर्गिक प्रक्रिया आहे आणि अपत्यप्राप्तीसाठी असणारी पूर्वअट आहे, हे प्रत्येक मुलीस आणि महिलेस माहीत असणे खूप

आवश्यक असल्याचे सांगून, चुकीच्या किंवा अशास्त्रीय माहितीमधून होणारे गैरसमज आणि अंधश्रद्धा यापासून दूर राहाण्यासाठी मार्गदर्शन केले. याप्रसंगी यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थिनी आणि शिक्षिका यांनी या कार्यक्रमास उस्फूर्त प्रतिसाद दिला. जवळपास १३०-१४० मुलींची उपस्थिती होती.

**जळगाव :** शाखेच्या विविध उपक्रम विभाग आणि वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग आणि महिला सहभाग विभाग तर्फे 'वयात येताना' (लैंगिकता प्रबोधन कार्यक्रम) मानवसेवा माध्यमिक विद्यालय, जळगाव येथे संपन्न झाला. मुख्याध्यापिका प्रतिभा सूर्यवंशी, शिक्षक गिरीश जाधव, आंबटकर मॅडम आणि व्याख्याते दिलीप भारंबे आणि दिगंबर कट्यारे यांचे सहकार्य लाभले.

**करवीर :** काडसिद्धेश्वर हायस्कूलमध्ये समितीमार्फत लैंगिक शिक्षणअंतर्गत 'वयात येताना' या विषयावर किशोवयीन मुलामुलींची मुक्ता निशांत यांनी संवादशाळा घेतली. पौगंडावस्थेत शारीरिक आणि मानसिक बदल होत असतात. योग्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून या नैसर्गिक बाबींकडे आपण काळजीपूर्वक पाहाणे आणि चुकीच्या महितीमुळे/गैरसमजामुळे होणारी हानी टाळणे यावर मार्गदर्शन केले. हा उपक्रम जिल्हा महिला कार्यवाह मुक्ता निशांत, काडसिद्धेश्वर हायस्कूलचे विजय सरगर सर आणि प्राचार्य होनगेकर सर यांनी यशस्वीपणे राबविला.

**शहादा (नंदुरबार) :** उमलत्या वयातील जाण आणि भान या विषयावरील कार्यक्रम क्रिएटिव इंग्लिश मीडियम स्कूल, शहादा येथे दिनांक २४ जुलै २०२४ रोजी घेण्यात आला. त्यासाठी डॉ. मालविका कुलकर्णी, डॉ. विवेक पटेल व डॉ. अलकाताई कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना वरील विषय सविस्तरपणे समजून दिला.

**अंधश्रद्धेची दुनिया... विज्ञानाची किमया**

**नागपूर :** जवाहरलाल नेहरू विद्यालय येथे एकाच वेळी पटावरील सुमारे ६०० विद्यार्थ्यांना 'अंधश्रद्धेची दुनिया... विज्ञानाची किमया' या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वैज्ञानिक प्रात्यक्षिकाच्या उपक्रमाने आकर्षित केले.

यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी मुख्याध्यापिका कमल बुरहान यांच्या हस्ते पाण्याच्या दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात केली. परत परत रिकाम्या भांड्यामधून पाणी काढणे, चिरंजीचा प्रसाद काढणे, लंगर सोडवणे, केशाकर्षणाने निर्जीव वस्तूचे दुधाला प्राशन करणे, ध्वनी-भ्रम, दृष्टी-भ्रम, गुरुत्व-मध्य अशा नानाविध प्रयोगांची प्रात्यक्षिके करून दाखवत त्यामागील विज्ञान समजावून सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी आनंदी व निर्व्यसनी आयुष्य जगत वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करावा असा संदेश आळणे यांनी विद्यार्थ्यांना दिला. मनीष अडागळे यांनीही यात भाग घेतला.

कार्यक्रमाला महा. अंनिस सावनेर शाखेचे ज्येष्ठ कार्यवाह आदरणीय सेवकरामजी राऊत, शाखा अध्यक्षा मनीषा साखरे, उपाध्यक्ष चंद्रशेखर ढोबळे, प्रफुल्लकुमार वडे, अमोल डहाट, कृष्णराव हराळकर, विवेक गजभिये, मोरेश्वर गोडबोले, प्रीती बागडे, विनोद तांदूळकर, पल्लवी तांदूळकर, सतीश चौधरी, रितेश झिले, सुधाकर गजभिये, मुरलीधर भोयर, आरती पांडव, रश्मी जबलपुरे, मंदा ढोके, रेखा गोरले, अरुणा बनसिंगे, विजया हटेवार, योगेश बंग इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन शाखा प्रधानसचिव माधुरी बारमासे यांनी केले, तर आभार शाखा उपाध्यक्ष मनीष अडागळे यांनी मानले.

**सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह**

**गडचिरोली :** शासकीय आदिवासी मुलांचे इंग्रजी माध्यम शाळा सेमाना येथे शिक्षण सप्ताहअंतर्गत 'शाळेच्या विकासात समाजाचा सहभाग' व 'पर्यावरणात सापाचे महत्त्व' या विषयांवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी आदिवासी एम्प्लॉईजचे अध्यक्ष भरत येरमे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून महा. अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर, गडचिरोली शहर शाखेचे कार्याध्यक्ष उपेंद्र रोहनकर, अतिथी म्हणून सेवानिवृत्त माहिती अधिकारी प्रभाकर कोटरंगे उपस्थित होते. प्रधानसचिव हरिदास कोटरंगे यांनी विषारी-निमविषारी व बिन विषारी याप्रकारे सापांची संपूर्ण माहिती दिली. सर्पदंश झाल्यावर कोणत्याही बुवा-बाबा, मांत्रिक, पुजारी किंवा मंदिर, मस्जिद, चर्च, दर्गा आदी करत न बसता शासकीय रुग्णालयात दाखल करून त्या व्यक्तीचा जीव वाचवावा असे मार्गदर्शन केले. 'आता धरू एकच ध्यास, ना मरेल माणूस ना मरेल साप', असा नारा देऊन सापांना वाचविण्याचे आवाहन केले. उपेंद्र रोहनकर यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय यावर विवेचन केले. महिलांच्या

किंवा पुरुषांच्या अंगात देवी येणे शक्य नाही हे मुलांना समजावून सांगण्यासाठी स्वतः हातावर कापूर जाळून ते तोंडात टाकून प्रयोगाद्वारे पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका महाले मॅडम यांनी, तर सूत्रसंचालन शिक्षक सुभाष लांडे यांनी केले.

**सानपाडा (नवी मुंबई) :** शाखेतर्फे सर्पविज्ञान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम शनिवार, दिनांक ०३ ऑगस्ट, २०२४ रोजी कोपरखैरणे येथील सेक्टर ४ मधील, विद्यादीप विद्यालयात पार पडला. कार्यक्रमात ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सर्पतज्ज्ञ उल्हास ठाकूर यांनी पीपीटीद्वारे मुलांशी संवाद साधला व त्यांच्या सापांबद्दलच्या अंधश्रद्धा दूर केल्या. दूध हे सापाचे अन्न नाही, बेडूक व छोटे कीटक हे आहे. सापाच्या अंगावर केस कधीही नसतात. सापाला एकापेक्षा अनेक डोकी कधीच नसतात, सापाच्या डोक्यावर नागमणी असतो ही सुद्धा अंधश्रद्धा आहे ही महिती दिली. यावेळी अशोक निकम, गजानन जाधव, ज्योती क्षीरसागर इत्यादि कार्यकर्ते उपस्थित होते.

**राधानगरी :** शाखेच्या वतीने राधानगरी सोन्याची शिरोली या शाळेमध्ये सर्पविज्ञान या विषयावर हर्षल जाधव यांनी मांडणी केली. त्यामध्ये त्यांनी सर्प शेतकऱ्याचा कसा मित्र आहे, अन्नसाखळीतील सापांचे महत्त्व, सापाच्या विषाचा उपयोग, सापांची विविध प्रकार, विषारी बिनविषारी आणि निमविषारी सापांविषयी माहिती सांगितली. साप चावल्यानंतर घ्यावयाच्या प्रथमोपचाराबद्दल माहिती दिली. सोबतच सापांबद्दल असणाऱ्या विविध अंधश्रद्धा यांबद्दलदेखील मांडणी केली. यावेळी विद्यामंदिर सोन्याच्या शिरोलीचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी, मुख्याध्यापक नारायण आयरे सर आणि शिक्षकवृंद उपस्थित होते.

**वर्धा :** सापांची पूजा करून सापांची हत्या करू नका, असे आर्जवी आवाहन समितीचे राज्य प्रधानसचिव व सर्प अभ्यासक गजेंद्र सुरकार यांनी प्रबोधन करताना विद्यार्थ्यांना केले. मानवी जीवनातील व पर्यावरणातील सापांचे योगदान, विषारी, बिनविषारी साप कसे ओळखायचे याबाबत विस्तृत माहिती दिली. सापाबद्दल अंधश्रद्धा व गैरसमजुतीचे निराकरण शास्त्रीय माहिती देऊन दूर केले. नागपंचमीच्या निमित्ताने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा येथे संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सर्पविज्ञान कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी मंचावर प्राचार्या श्वेता कुळकर्णी मॅडम, पर्यवेक्षक प्रा. कडूस्कर, प्रा. विलास भगत, प्रा. राठोड, प्रा. सालंकार, प्रा. नाखले, प्रा. काळे मॅडम, प्रा. चौथमल मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भगत यांनी, तर आभारप्रदर्शन प्रा. कडूकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षक वर्ग तसेच कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा बैठक

**करमाळा (सोलापूर) :** जिल्हा बैठकीचे आयोजन करमाळा अंनिस शाखेने यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्था यशकल्याणी सेवाभवन, करमाळा येथे केलेले होते. बैठकीच्या सुरुवातीला करमाळा अंनिस शाखेचे ज्येष्ठ कार्यकर्ते इसाक उर्फ अशोक पठाण सर व अशोक इंदुरे यांना आदरांजली वाहण्यात आली. बैठकीची सुरुवात आनंदी ताई घिगे-पाटील व अनिल माने यांच्या चळवळीच्या गीताने करण्यात आली. पहिल्या सत्रामध्ये जिल्ह्याच्या शाखानिहाय आढावा घेण्यात आला. यामध्ये प्रत्येक शाखेने आपल्या शाखेचे अहवाल वाचन केले. महाराष्ट्र राज्याचे अंनिसचे सरचिटणीस सुधाकर काशीद यांनी राज्य कार्यकारिणीचा अहवाल सादर केला व आधुनिक भोंदू बुवाबाजीविषयी प्रबोधन केले. त्याबरोबर नोव्हेंबर २०२४ मध्ये आळंदी येथे महा.अंनिसच्या ३५व्या वर्धापन दिनानिमित्त होणाऱ्या अधिवेशनास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले. सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष धर्मराज चवरे यांनी अंनिसची पंचसूत्री समजावून सांगितली. राज्याचे बुवाबाजी संघर्ष कार्यवाह ॲड. गोविंद पाटील यांनी कार्यकर्ता कसा असावा, याचे विस्तृतपणे मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्राची सुरुवात मा. प्राचार्य नागेश माने यांच्या मधुर बासुरी वादनाने व कवी नवनाथ खरात सर यांच्या चळवळीच्या गझलेने करण्यात आली. संतोष माने, किसन कांबळे व टेंभुर्णी शाखेचे कार्याध्यक्ष नागनाथ शिंदे यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर शाखेचे व्ही. आर. गायकवाड सर व करमाळा उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ.स्मिता बंडगर तसेच विजयसिंह ओहोळ, ग्रामपंचायत सदस्य केम, हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी सौ.शितलताई गणेश करे-पाटील यांचा अंनिस

कार्यकर्त्यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष व यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. गणेश भाऊ करे-पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. ॲड. बाबुराव हिरडे यांचे 'आत्मघात' व्यसन दुष्परिणाम व व्यसनमुक्ती या विषयावरील पुस्तक दादासाहेब पिसे यांचा 'प्रवासात' कवितासंग्रह आलेल्या सर्व कार्यकर्त्यांना सप्रेम भेट देण्यात आला. करमाळा अंनिस शाखेचे संजय हंडे, दिगंबर साळुंखे, बाळासाहेब दुधे, रामचंद्र बोधे, कैलास लोंढे, संतोष कांबळे, दादासाहेब पिसे, डॉ.आप्पासाहेब लांडगे, भिवा आप्पा वाघमोडे, महादेव कन्हेरे, महेश वैद्य, जनार्दन पवार सर, प्राध्यापक शिवाजी दळवी, विठ्ठल साळुंखे, गजेंद्र गायकवाड, संभाजी अनंत कवळस, मनोहर गोडसे, विठ्ठलराव वठारे, ॲड. संजय कांबळे, मोहित निकम, मीनाक्षी हंडे, संगीता निंबाळकर, ज्योती साने, सानिका माने, स्वाती माने, ओंकार माने, श्रेयस साने, तेजस्विनी साने, आरती चोपडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक करमाळा अंनिस शाखेचे कार्याध्यक्ष अनिल माने यांनी केले व आभार राजेंद्र साने यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता 'हम होंगे कामयाब' या गीताने करण्यात आली.

**नवी मुंबई :** 'जिल्हा बैठक' रविवार, दि. २८ जुलै, २०२४ रोजी पार पडली. बैठक कोपरखैरणे येथील सेक्टर ४ मधील 'आदित्य विला' येथे घेण्यात आली. बैठकीला निरीक्षक म्हणून राज्य सरचिटणीस विजय परब उपस्थित होते. इस्लामपूर येथे पार पडलेल्या राज्य कार्यकारिणीचा वृत्तांत बैठकीत सांगितला. जिल्ह्यातील कामांची साधकबाधक चर्चा करण्यात आली. बैठकीत पुढील कार्यकर्ते उपस्थित होते - अशोक निकम, गजानंद जाधव, पवन कोकाटे, प्रदीप कासुर्डे, राजेंद्र पंडीत, महेंद्र राऊत, किरण जोशी, ए. एच. शाह, निरंजन थोरात व किरण वाळुंज.

**लातूर :** जिल्हा कार्यकारिणीची बैठक उदगीर येथे दि.२३ जून रोजी संपन्न झाली. या बैठकीस एकूण १३ शाखांचे ४३ प्रतिनिधी उपस्थित होते. राज्य कार्यकारिणीच्या बैठकीचा वृत्तांत वाचण्यात आला.

**विज्ञान छंद मंडळाचे उद्घाटन**

**नाशिक :** विज्ञानाने लावलेले शोध हे मानवाच्या कल्याणासाठी वापरायचे की विनाशासाठी हे मानवाने ठरवायचे आहे. दैनंदिन जीवन सुखमय करण्यासाठी विज्ञान व वैज्ञानिक दृष्टीकोन आवश्यक असल्याचे प्रतिपादन समितीचे राज्य प्रधानसचिव डॉ. ठकसेन गोराणे यांनी केले. ते सोनांबे जनता विद्यालयात विज्ञान छंद मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक शिवनाथ पांगारकर अध्यक्षस्थानी होते. विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक डॉ. भागवत आरोटे, सेवानिवृत्त पर्यवेक्षक एकनाथ खैरनार, शालेय समितीचे अध्यक्ष नंदू पाटील-पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक कचरू पाटील-पवार, ज्येष्ठ शिक्षक शांताराम चांदोरे, पंडित चीने, सोपान पवार, दीपक पगारे, सांस्कृतिक प्रमुख दीपक भालेराव, ज्योती पाटील, जनाबाई सूडके आदी मंचावर उपस्थित होते.

डॉ. गोराणे यांनी विज्ञान छंद मंडळाचे उद्घाटन करून, त्या निमित्ताने वैज्ञानिक दृष्टीकोन व चमत्कार प्रात्यक्षिक सादरीकरण केले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेतले. हा सप्रयोग प्रबोधनाचा कार्यक्रम चांगलाच रंगला. वैज्ञानिक दृष्टीकोनाची व्याख्या, वैज्ञानिक दृष्टिकोन तपासायच्या पाच पायऱ्या तसेच चमत्कार सदृश्य घटना घडण्यामागील प्रमुख चार कारणे त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर समजावून सांगितली. विद्यार्थ्यांकडून काही प्रात्यक्षिकेही करवून घेतली. यावेळी विज्ञान छंद मंडळाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. डॉ.अब्दुल कलाम व डॉ. सी. व्ही. रमन यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यालयाच्या गीतमंचाने विज्ञानगीत सादर केले.

रूपावली काळे यांनी प्रास्ताविक केले. शबानाबी कादरी यांनी आभार मानले. मीना केदार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी कु. प्रणाली पवार तसेच भागवत आरोटे, एकनाथ खैरनार, प्रभारी मुख्याध्यापक शिवनाथ पांगारकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कलाशिक्षक मिलिंद पाटील, विज्ञान शिक्षिका भारती धाकतोडे, सोनाली पाटील, रोहिणी पवार, प्रयोगशाळा सहाय्यक सुनील पवार यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत विशेष कक्ष स्थापन**

**मुंबई :** प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत विशेष कक्ष स्थापन करण्यात यावे, असे

पत्रक विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.) डॉ. छेरिंग दोरजे यांनी प्रसृत केले. यासाठी दि. ६ ऑगस्ट रोजी त्यांची भेट घेऊन त्यांचे विशेष आभार मानण्यासाठी व इतर चर्चा करण्यासाठी अंनिसचे कार्यकर्ते कायदा विभागाच्या सहकार्यवाह ॲड. तृप्ती पाटील, राज्य प्रधानसचिव नंदकिशोर तळाशिलकर, विजय परब, रूपेश शोभा, अर्चना सोनावणे गेले होते.


**पोलीस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल**


**उदगीर (लातूर) :** मनोज लोया यांच्या घरी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उपाध्यक्ष ग्रंथपाल प्रा. बाबुराव माशाळकर व सचिव प्रा. डॉ. बळीराम भुक्तरे यांनी भेट दिल्यावर घडलेल्या प्रकाराची सविस्तर माहिती मिळाली. कर सल्लागार मनोज लोया व ॲड. सौ. लोया दोघेही सुशिक्षित. तरी पण घडलेल्या प्रकारामुळे अस्वस्थच वाटले. असुयेपोटी कुणीतरी पहाटे पाच वाजता येऊन घरातील लोकांची नावे टाकलेला लिंबू, त्यावर मसुरी खिळे, मिरच्या व कुंकू प्रवेशद्वारात टाकल्या होत्या. सीसीटीव्हीला चकवा देत ते टाकणारी व्यक्ती निघून गेली असे लोया कुटुंबीयांकडून सांगण्यात आले. असे अनुचित प्रकार पुन्हा कोठेही शहरात घडू नयेत म्हणून लोया कुटुंबीयांनी रीतसर गुन्हा नोंदवून जागरूकता दाखविली. त्याबद्दल महा. अंनिस उदगीर शाखेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून त्यांना धीर देण्यात आला. तसेच पोलीस निरीक्षक सोनकवडे साहेबांनी या प्रकाराचे गांभीर्य ओळखून तत्परतेने केस दाखल करून घेतल्याबद्दल महा. अंनिस उदगीर शाखेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

**वैज्ञानिक जाणिवा प्रशिक्षण शिबिर**

**भडगाव :** शाखेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक जाणिवा प्रशिक्षण शिबिराचे दि.२८ जुलै रोजी आयोजन करण्यात आले होते. यात हेमलता पाटील यांनी स्त्रिया व अंधश्रद्धा, योगेश शिंपी यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, जिल्हाध्यक्ष रवींद्र चौधरी यांनी बुवाबाजी व शोषण तसेच राज्यकार्यवाह प्रा. दिगंबर कट्यारे यांनी 'प्रयोगातून विज्ञान' या विषयावर शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. शिबिरात शहरांतील विविध शाळांच्या ५० विद्यार्थ्यांनी व १० शिक्षकांनी भाग घेतला. शिबिरानंतर विद्यार्थ्यांची स्वयंअध्ययन परीक्षा घेण्यात आली. शिबिर यशस्वितेसाठी युनूस, फिरोज यांनी विशेष परिश्रम घेतले.

●






# महा. अंनिसचे विविध उपक्रम



सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह, सानपाडा (नवी मुंबई)
गजानन जाधव, ज्योती क्षीरसागर व साथी




वैज्ञानिक जाणिवा प्रशिक्षण शिबीर, भडगाव (जळगाव)
दिगंबर कट्यारे, रवींद्र चौधरी, हेमलता पाटील व साथी



सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह, वर्धा
यावेळी मार्गदर्शन करताना गजेंद्र सुरकार




सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह, गडचिरोली
विलास निंबोरकर, उपेंद्र रोहनकर व साथी



'अंधश्रद्धेची दुनिया... विज्ञानाची किमया', नागपूर
यावेळी मार्गदर्शन करताना गौरव आळणे व साथी



जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत विशेष कक्ष स्थापन
करण्यासाठी निवेदन देताना, मुंबई ॲड. तृप्ती पाटील,
नंदकिशोर, विजय, रुपेश, अर्चना व साथी




जिल्हा बैठक, करमाळा (सोलापूर) ॲड. गोविंद पाटील, सुधाकर काशीद,
धर्मराज चवरे, नागनाथ शिंदे, व्ही.आर.गायकवाड व साथी

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक नववा, ५ सप्टेंबर २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 9, 5th September 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

**वर्षभरात वार्षिक विशेषांक आणि १० मासिक अंक मिळवा घरपोच**

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



**वार्षिक वर्गणीदार व्हा!**
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

- संपर्क - व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळींवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ____________________

____________________

____________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.